# महाराष्ट्र विधानसभा

**द्वितीय अधिवेशन, २०२३**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

## मोहळाई (ता.भोकरदन, जि.जालना) येथील शेत शिवारातील दोन रोहित्रांची कामे अपूर्ण अवस्थेत असल्याबाबत

**(१) ५३५३ (०२-०४-२०२०). श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहळाई (ता.भोकरदन, जि.जालना) येथील शेत शिवारातील दोन रोहित्रांची कामे ठेकेदाराकडे चार वर्षांपासून अपूर्ण अवस्थेत असून महावितरणही याकडे दुर्लक्ष करीत असल्याची बाब माहे जानेवारी २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणची लोकसंख्या १ लाखा पर्यंत असल्याने रोहित्रांची संख्या अपुरी पडत असल्याने वीज वारंवार खडित होत असल्यामुळे ग्रामस्थांनी नव्याने रोहित्र उभारण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन रोहित्रांची कामे तातडीने पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०४-२०२३) :** (१) हे खरे नाही.

मोहळाई (ता. भोकरदन, जि. जालना) येथील शेत शिवारातील वाडी-वस्ती मधील शेतीपंपांचे मंजूर कामे पूर्ण झालेली आहेत.

(२) हे खरे नाही.

मोहळाई (ता. भोकरदन, जि. जालना) या गावात एकूण ११० वीज ग्राहक असून त्या गावामध्ये १०० केव्हीए चे दोन रोहित्रे आहेत व गावातील वीज ग्राहकांना वीज पुरवठा सुरळीत चालु आहे. तसेच सदर वाडी-वस्ती मध्ये जिल्हा वार्षिक योजना सन २०२१-२२ अंतर्गत २५ केव्हीए चे रोहित्र दि. २२.०५.२०२२ रोजी कार्यान्वित करण्यात आले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वाहतूक नियमांचे पालन न केल्याने मोडल्यामुळे वाहतूक पोलीसांकडून वाहनचालकांना देण्यात येणाऱ्या ई-चलानाबाबत

**(२) ३२६२१ (१०-०१-२०२२). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.चिमणराव पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वाहतूक नियमांचे पालन न केल्याने वाहतूक पोलीसांकडून वाहनचालकांवर ई-चलान भरण्याबाबत महामार्ग पोलीसांकडून ताकीत देण्यात आल्यानंतर किती वाहनचालकांनी दंडाची रक्कम दिनांक ०१ जानेवारी, २०२१ रोजी ते माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान भरली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई शहरात सर्वाधिक ई-चलानची रक्कम थकीत असून सदर रक्कम वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०३-२०२३) :**(१) दिनांक ०१ जानेवारी, २०२१ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०२१ या कालावधीत राज्यातील एकूण ६३,८५,४१९ वाहनांच्या चालक/मालक यांनी ई-चलान द्वारे रु.२१९,०८,७७,३५०/- इतक्या दंडाच्या रकमेची भरणा केलेली आहे.

(२) थकीत चलान वसुल करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे :

i) प्रलंबित चलन रक्कम असलेल्या संबंधित वाहन मालकांना वेळोवेळी MumTrafficapp व MahaTrafficapp वर नोटीफिकेशन पाठविण्यात येते.

ii) मुंबई मधील चलन रक्कम प्रलंबित असलेल्या वाहन मालकांना वाहतुक पोलीस मुख्यालयातील हेल्पलाईन द्वारे त्यांच्या वाहनांवरील चलन रक्कम भरणा करणेबाबत फोनद्वारे सूचना देण्यात येते.

iii) लोक अदालत द्वारे सप्टेंबर २०२१ व डिसेंबर २०२१ या महिन्यांमध्ये दोन वेळा संबंधित वाहन मालकांना प्रलंबित चलन भरणा करणेबाबत एस.एम.एस. द्वारे नोटीस देवून प्रलंबित चलान रक्कम भरणा करुन घेण्यात येते.

iv) रु.१५,०००/- व त्यापेक्षा जास्त चलन रक्कम प्रलंबित असलेल्या वाहनांवरील प्रलंबित चलन भरणा करणेबाबत सूचनापत्र देण्यात येते व अशा वाहनांची यादी मुंबई शहरातील सीसीटीव्ही सर्वेलन्स अंतर्गत निगराणीवर ठेवण्यात येवून ॲलर्ट प्राप्त होताच संबंधीत वाहतूक विभागामार्फत प्रलंबित चलन भरणा करुन घेण्यात येते. तसेच जास्त चलन रक्कम प्रलंबित असलेल्या वाहनांची यादी संबंधित परिवहन कार्यालयास माहिती व पूढील कार्यवाहीकरिता पाठविण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जिल्हा पुणे येथील नद्यांच्या निळी व हिरवी रेषेतील भागामध्ये बेकायदेशीर बांधकामे झाल्याबाबत

**(३) ३६३६० (०६-०१-२०२२). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलसंपदा विभागाने पुणे शहरातील पाषाण व बाणेर भागातील मुळा,देव व राम नद्यांबरोबच ओढयाची केलेल्या सर्वेक्षणात नद्यांमध्ये भराव टाकून अतिक्रमण केल्याचे तसेच नद्यांच्या निळी व हिरवी रेषा या ठरविण्यात आलेल्या सीमांमध्ये ( (boundary places)बांधकामे करण्यात आली असून नवीन बांधकामे करण्यात येत असल्याचे दिनांक १३ ऑक्टोबर,२०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अतिक्रमण करून बांधकाम केल्यामुळे ओढ्याच्या व नदीकडील गृहनिर्माण सोसायट्या, पार्किंग प्लेस, घरांमधे व रुग्णालयामध्ये पाणी शिरून जीवितहानी व मालमत्तेचे नुकसानीच्या घटना प्रत्येकवर्षी घडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी नदीपात्रातील संबधित अतिक्रमण धारकांविरोधात व नवीन बांधकामे करणाऱ्या विरुद्ध शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०३-२०२३) :** (१) होय हे अंशत: खरे आहे.

जलसंपदा विभागाचे शा.नि.क्र. पुरनि-२०१८/(१८२/२४३/८९/सिंव्य.(महसूल), दि.०३/०५/२०१८ व जलसंपदा विभागाचे शा.नि.क्र.पुरनि-२०१८//(१८२/२४३/८९/ सिंव्य.(महसूल), दि.१०/०७/२०१९ अन्वये पुराचा संभाव्य धोका टाळण्यासाठी पुररेषेच्या आत कोणतेही बांधकाम न होण्याच्या दृष्टीने पूररेषेची आखणी करणे व निषिध्द व नियंत्रित क्षेत्राचा उपयोग करण्याबाबत दिलेल्या मार्गदर्शक सुचनांचे अनुषंगाने संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनी बांधकाम परवानगी देऊन त्याबाबत नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

यास्तव, पुणे महानगरपालिकेच्या हद्दीमधून वाहणाऱ्या मुळा-मुठा, रामनदी व देवनदी यांचे ब्ल्यू लाईन व रेड लाईनचे नकाशे जलसंपदा विभागाकडून पुणे महानगरपालिकेस देण्यात आले आहेत. राम नदी पुणे महानगरपालिका हद्दीतून बावधन, पाषाण, बाणेर या गावातून मुळा नदीपर्यंत वाहत जाते. तसेच मुळा नदी बाणेर बालेवाडी या भागातून वाहत जाते.

जलसंपदा विभागाकडून प्राप्त ब्ल्यू लाईन व रेड लाईन नकाशानुसार एकत्रिकृत विकास नियंत्रण नियमावली नियम क्र.३.१.३ अन्वये बांधकाम परवानगी देणेबाबतची कार्यवाही पुणे महानगरपालिकेमार्फत करण्यात येते.

ब्ल्यू लाईन क्षेत्रामध्ये झालेले पत्राशेड सदृश्य अनधिकृत बांधकाम निदर्शनास आल्यानंतर एम.आर.टी.पी. ॲक्ट १९६६ चे कलम ५३ (१) अन्वये नोटीस देऊन कार्यवाही पुणे महानगरपालिकेमार्फत करण्यात आली आहे.

(२) पुणे महानगरपालिका, पुणे कार्यालयाने शासनास सादर केलेल्या अहवालामध्ये नमूद केल्यानुसार, सप्टेंबर-२०१९ मध्ये झालेल्या अतिवृष्टीच्या वेळेस मुळा नदीच्या पाणी पातळीत वाढ झाल्याने मुळा नदीस मिळणाऱ्या ओढ्यांची नदीच्या बॅक वॉटरमुळे पाणी पातळीत वाढ झाल्याने काही सोसायटीमध्ये व एका रुग्णालयामध्ये पाणी गेल्याचे निदर्शनास आले होते.

(३) पुणे महानगरपालिका, पुणे कार्यालयाने शासनास सादर केलेल्या अहवालामध्ये नमूद केल्यानुसार, राम नदीबाबत मा.हरीत लवाद न्यायालय यांचे कोर्टात चालू असलेली याचिका नं.३९/२०१५ च्या अनुषंगाने जलसंपदा विभागाकडून राम नदीचे ब्ल्यू लाईन व रेड लाईनचे नकाशे पुणे महानगरपालिकेस सादर करण्यात आलेले आहेत. तसेच मा.कोर्टाचे आदेशानुसार रामनदीचे ब्ल्यू लाईन क्षेत्रामधील बांधकामे निश्चितीकरण करुन अहवाल सादर करणेबाबत आदेश देण्यात आले होते. त्यानुसार कार्यकारी अभियंता,पुणे महानगरपालिका, कार्यकारी अभियंता, पीएमआरडीए, कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग, टी.आय.एल.आर. भूमि अभिलेख यांची संमती गठीत करण्यात येऊन मा.न्यायालयास अहवाल सादर करण्यात आला आहे. त्यानुसार ब्ल्यू लाईन व रेड लाईन नकाशे सादर होणेपूर्वी मंजूर बांधकामे तसेच २० वर्षापूर्वीच्या जुन्या इमारती व धार्मिक स्थळे असे तक्तेनिहाय अहवाल मा.न्यायालयास सादर करण्यात आला असून पुढील सुनावणी होणे बाकी आहे.

पाषाण स.नं. ११५/१ येथील मान्य विकास योजना आराखडा २०१७ च्या ग्रीन बेल्ट आरक्षणामधील असलेल्या अतिक्रमण बांधकामावर कारवाई करणेबाबत (NGT) कोर्ट केस नं.६१४/२०१९ च्या आदेशानुसार संबंधित जागा मालकाला महाराष्ट्र रिजनल ॲन्ड टाऊन प्लॅनिंग ॲक्ट १९६६ चे कलम ५३(१) अन्वये जा.क्र.झोन ६/२७६१ दि.२२/०३/२०१९ ची नोटीस देण्यात आलेली आहे व त्यानुसार सदरचे ग्रीन बेल्ट मधील अनधिकृत बांधकाम काढून घेण्यात आले आहे.

तसेच मा.हरीत लवाद न्यायालय वेस्टर्न झोन, पुणे बेंच यांचे न्यायालयात चालू असलेली याचिका क्र.४९/२०१९ अनुषंगाने मुळा व मुठा नदीचे ब्ल्यू लाईनमधील अनधिकृत बांधकाम/पत्राशेड यांना व ज्या ठिकाणी भराव टाकण्यात आलेला आहे, अशा जमिन मालकांना एम.आर.टी.पी. ॲक्ट १९६६ चे कलम ५३(१) अन्वये पुणे महानगरपालिकेमार्फत नोटीस देण्यात आलेली आहे. तसेच सदर ठिकाणचा भराव हा महापालिकेकडील जे.सी.बी. व डंपरच्या सहाय्याने व काही जमिन मालकांनी स्वत:हून उचलणेस सुरुवात केली असून आतापर्यंत बाणेर बालेवाडी भागातून वाहणाऱ्या मुळा नदी काठावरील २२५२ डंपर ट्रिपच्या सहाय्याने २४३९६ घन.मी. राडारोडा/भराव उचलण्यात आलेला आहे. तसेच ७६२७५ चौ.मी. पत्राशेडवर कारवाई करुन सदरचे पत्राशेड, सदृश्य बांधकाम पुणे महानगरपालिकेकडून निष्कासित करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नळेगाव (जि.लातूर) येथे चाकूर पोलिस ठाणेअंतर्गत येणाऱ्या पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये वाढ करण्याबाबत**

**(४) ३८२७० (०७-०४-२०२२). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नळेगाव (जि.लातूर) येथे चाकूर पोलीस ठाणेअंतर्गत येणाऱ्या दूरक्षेत्रावर ३२ गावांचा भार असून सुमारे २५ हजार लोकवस्ती असून या परिसरातील अनेक गावातील गावकरी मोठ्या बाजारात येत असून संवेदनशील गाव म्हणून पोलीस दप्तरी नोंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पोलीस स्टेशनमध्ये पाच पोलीस कर्मचाऱ्यांना एवढ्या मोठ्या लोकवस्तीचा कारभार पाहणे शक्य होत नसल्यामुळे पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांची संख्या वाढविण्याबाबत तेथील लोकप्रतिनिधी यांनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी पोलिस अधिकारी व पोलिस कर्मचाऱ्यांमध्ये वाढ करण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०३-२०२३) :**(१) होय.
(२) होय.
(३) नळेगांव दूरक्षेत्र येथे नवीन पोलीस ठाणे निर्माण करण्याचा प्रस्ताव प्राप्त आहे. तथापि, सद्यस्थितीत संपूर्ण पोलीस दलाचा आकृतिबंध अंतिम करण्याचा विषय चालू आहे. त्यावर निर्णय झाल्यानंतर नळेगाव पोलीस ठाणे निर्माण करणेबाबत उचित कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाड ( जि.रायगड ) तालुक्याच्या नदयांमधील गाळ काढण्याबाबत**

**(५) ३९८७७ (१२-०४-२०२२). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाड (जि.रायगड ) तालुक्यातील वरंध, भावे, शिवथर येथे गेल्या दोन वर्षापासून होत असलेल्या महापुरामुळे तालुक्यातील नदयांमध्ये प्रचंड गाळ साचल्यामुळे क्षेत्र कोणते व नदी कोणती अशी परिस्थिती निर्माण झाल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तालुक्यातील नदयामधील गाळ काढण्याबाबत तसेच गाळ काढण्याच्या कामास विशेष निधीस मंजूरी मिळाली असून सदरहू काम सीआरझेड व पर्यावरणाची मान्यता न आल्यामुळे प्रलंबित असल्याचे नुकतेच माहे जानेवारी,२०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास सदर प्रकरणी सीआरझेड व पर्यावरणाची मान्यता न मिळण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, तसेच शासनाने सदरहू ठिकाणची पहाणी केली आहे काय, पहाणीमध्ये काय आढळून आले, तद्अनुषंगाने नदीतील गाळ काढण्याच्या कामास विशेष निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०३-२०२३) :** (१) होय.
(२) हे अंशत: खरे आहे.
दिनांक १३.०५.२०२२ रोजी पार पडलेल्या MCZMA च्या १५८ व्या बैठकीत सदर प्रकल्पासाठी CRZ Clearance मिळणेबाबत SEIAA ची मान्यता मिळणेबाबत शिफ़ारस करण्यात आली. सदर शिफ़ारशीनुसार दिनांक १९.०५.२०२२ रोजी State Level Environmental Impact Assessment Authority च्या २४३ व्या बैठकीत CRZ clearance मिळालेला आहे. त्याअनुषंगाने CRZ भागातील गाळ व बेटे काढण्याची कार्यवाही यांत्रिकी विभाग व स्थानिक संयंत्र धारकामार्फत सुरु करण्यात आलेली आहे. यापूर्वी पावसाळी हंगाम सुरु असल्याने सदर काम थांबवून पावसाळ्यानंतर पूर्ण करावयाचे नियोजित आहे.
CRZ clearance मधील अटींमध्ये पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने अटींचा अंतर्भाव असून MoEF & CC च्या दिनांक १५.०१.२०१६ च्या अधिसुचनेनुसार ज्या प्रकरणांना पर्यावरण विषयक मान्यतेची आवश्यकता नाही त्यामध्ये सदर कामाचा समावेश आहे. ( Appendix - IX/ Pt. No.६).
(३) दिनांक १९.०५.२०२२ रोजी State Level Environmental Impact Assessment Authority च्या २४३ व्या बैठकीत CRZ clearance मिळालेला असून MoEF & CC च्या दिनांक १५.०१.२०१६ च्या अधिसुचनेनुसार सदर कामास पर्यावरण विषयक मान्यतेची आवश्यकता नाही .

(४) होय.
सदर ठिकाणी भूस्खलनामुळे वाहून आलेला गाळ नदीपात्रात जमा झालेला दिसून आलेला आहे.
संयंत्र भाडेतत्वावर घेणे व इंधनाकरीता आपत्ती व्यवस्थापन-मदत व पुनर्वसनामार्फत एकूण रु.९.४७ कोटी निधी मंजूर झालेला आहे. उर्वरित गाळाच्या परिमाणाच्या निष्कासनाकरीता निधी मागणी प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चिखली (जि.बुलढाणा) येथे स्वतंत्र उपविभागीय पोलीस अधिकारी पद निर्मिती करण्याबाबत

**(६) ४०७०२ (१२-०४-२०२२). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिखली (जि.बुलढाणा) येथे उपविभागीय पोलीस बुलढाणा यांच्या अखात्यरित जवळपास ८ पोलीस स्टेशन येत असल्याने हा कार्यभार एका उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्याकडे असल्याने त्यांचा भार जास्त होऊन वाढती लोकसंख्या आणि वाढती गुन्हेगारी यामुळे एवढ्या मोठ्या क्षेत्रात काम करणे अत्यंत जिकरीचे होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तालुक्यासाठी स्वतंत्र उपविभागीय पोलीस अधिकारी (SDPO) पदाची निर्मितीचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक, बुलढाणा यांच्यामार्फत शासनाकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी स्वतंत्र उपविभागीय पोलीस अधिकारी (SDPO) पदनिर्मिती प्रस्तावास तातडीने मान्यता देण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २८ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेकडे लेखी निवेदनाव्दारे केली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात लेखी निवेदनाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०३-२०२३) :**(१) होय.
(२) याबाबतचा प्रस्ताव शासनास अद्याप प्राप्त नाही.
(३) व (४) होय
श्रीम.श्वेता महाले,मा. विधानसभा सदस्या यांनी शासनास दि.२८/१२/२०२१ च्या निवेदनाव्दारे केलेल्या विनंतीस अनुसरून पोलीस महासंचालक कार्यालयाकडून अभिप्राय मागविण्यात आले आहेत.तथापि, अद्याप त्याबाबतचे अभिप्राय शासनास प्राप्त नाहीत. सदरहू अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## साक्री तालुक्यातील (जि.धुळे) वाहणा-या पांझरा व कान नद्यांची पूरनियंत्रण रेषा निश्चित करण्याबाबत

**(७) ४१००५ (०५-०४-२०२२). श्रीमती मंजुळा गावीत (साक्री) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) साक्री तालुक्यातील (जि.धुळे) वाहणाऱ्या पांझरा व कान नद्यांची पूरनियंत्रण रेषा निश्चित करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, सदर तालुक्यातील नदी काठावरील साक्री, कासारे, भाडणे, दहिवेल व आजूबाजूच्या इतर गावात पूराचे पाणी शिरुन घरांची, शेतींची व मालमत्तेची नुकसान होत असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींनी पूररेषा निश्चित करण्यासाठी शासनाकडे वारंवार मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने पूर रेषा निश्चित करण्यास विलंब होत असण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने उक्त गावांमध्ये पुराच्या पाण्यामुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी पूर रेषा निश्चित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०४-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.
पुररेषा आखणीचे नकाशे अंतिम करून मंजुरीसाठी क्षेत्रीय स्तरावर कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(२) स्थानिक लोकप्रतिनिधींकडून पूररेषा निश्चित करण्यासाठी निवेदन शासनास प्राप्त झालेले नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) पुरेरषा आखणीचे नकाशे अंतीम करून मंजुरीसाठी क्षेत्रीय स्तरावर कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सावित्री व काळ (ता. महाड, जि. रायगड) नदीतील गाळ काढण्याबाबत**

**(८) ४१५१४ (१२-०४-२०२२). श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाड (जि. रायगड) येथे दिनांक २१ व २२ जुलै २०२१ रोजी आलेल्या महापुरास कारणीभूत असलेल्या सावित्री, काळ व गांधारी नदीत साचलेला गाळ व बेटे हे एक कारण असून महाड पूर निवारण समिती मार्फत सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे सावित्री व काळ नदीतील गाळ काढण्याचे काम दिनांक १७ जानेवारी २०२२ रोजी वा त्यासुमारास रितसर सावित्री नदीचा गाळ काढण्यास सुरूवात झाली आहे. मात्र प्रत्यक्षात पूरनिवारण समितीच्या सदस्यांनी सावित्री नदीचे सर्वेक्षण केले, तेव्हा हे काम अतिशय संथगतीने चालू आहे असे निदर्शनास आले. काम असेच चालू राहिले तर येत्या चार वर्षातसुद्धा गाळ काढून होईल की नाही अशी शंका पूर निवारण समिती कडून व्यक्त करण्यात आली आहे तसेच सद्यस्थितीत काळ नदीतील खरीवली गावाच्या हद्दीतील गाळ काढण्याचे काम एका पोकलेन मार्फत सुरू आहे. या ठिकाणी असणारा आणखी एक पोकलेन तातडीने चिपळून येथे पाठविण्यात आल्याची माहिती पाटबंधारे विभागाकडून देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त गाळ काढण्यासाठी आता केवळ चार महिन्यांचा कालावधी असल्याने पाटबंधारे खात्याने एकाच वेळेला, चिपळूण मध्ये ज्या युद्धपातळीवर अनेक पोकलेन लावून गाळ काढण्याचे कार्य सुरू आहे त्या पद्धतीने महाडमधील सावित्री व काळ नदीतील गाळ काढण्यात यावा अशी मागणी पूरनिवारण समितीमार्फत शासनाकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने सदरहू नदीतील गाळ काढणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०४-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
सावित्री व काळ नदीमधील गाळ काढण्याच्या कामासाठी जलसंपदा विभागांतर्गत यांत्रिकी संघटना, खाजगी संयंत्रधारक व लोकसहभाग यांच्यातर्फे सावित्री नदी व उपनद्या यांच्या पात्रामध्ये २५ पोकलेन,८ जे.सी.बी., ८४ टिप्पर आणि एक डोझर अशा संयंत्रांच्या सहाय्याने तसेच लोकसहभागातून एकुण १०. ९५ ल.घ.मी. इतका गाळ दिनांक ११ जून, २०२२ पर्यंत काढण्यात आला आहे. त्यामुळे जुलै,२०२२ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे सावित्री /काळ नदीमध्ये गंभीर पूरपरिस्थिती उद्भवली नव्हती.
तसेच सदर कामासाठी उपलब्ध झालेल्या यंत्रसामग्रीमधून चिपळूण येथे कोणतीही संयंत्रे हलविण्यात आलेली नाहीत.
(२) होय, हे खरे आहे.

(३) जलसंपदा विभागाकडील यांत्रिकी संघटनेच्या वाढीव संयंत्रांच्या, खाजगी संयंत्रधारक व लोकसहभागाद्वारे आवश्यकतेनुसार नद्यांमधील गाळ काढण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील प्रत्येक गावात व नगरपालिका क्षेत्रात सुरक्षेच्या दृष्टीने सी.सी.टि.व्ही. कॅमेरे बसविण्याबाबत**

**(९) ४१८५१ (०७-०४-२०२२). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील प्रत्येक गावात तसेच नगरपालिका क्षेत्रात नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने सी.सी.टि.व्ही. कॅमेरे बसविण्यात यावे, तसेच त्यांचे सर्व्हर हे प्रत्येक संबंधित पोलिस स्टेशनला जोडून एक स्वतंत्र निरीक्षक (ओबसर्व्हर) नेमण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्यांचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०४-२०२३) :**(१) सार्वजनिक सुरक्षितता, कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे, अतिरेक्यांच्या कारवाया रोखणे, धार्मिक कार्यक्रम व मिरवणुकांवर नियंत्रण ठेवणे, वाहतुकीचे नियंत्रण करणे तसेच संवेदनशील भागावर नियंत्रण ठेवणे इत्यादी बाबी परिणामकारकरित्या हाताळण्यासाठी सीसीटीव्ही संनिरीक्षण यंत्रणा बसविण्याबाबतची कार्यवाही अनेक शहरांमध्ये केली जात आहे. तसेच सीसीटीव्ही संनिरीक्षण यंत्रणा बसविण्यासाठी जिल्हा वार्षिक योजना, आमदार निधी व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून देखील निधी उपलब्ध करुन दिला जातो.
(२) शासन निर्णय, गृह विभाग, दिनांक ०९.०१.२०१७ अन्वये राज्यात विविध शहरात सीसीटीव्ही प्रकल्प राबविण्याबाबत मार्गदर्शक तत्वे विहीत करण्यात आली आहेत. तसेच दि.०७.०७.२०२२ रोजीच्या शासन पत्रान्वये महाराष्ट्र राज्यातील शहरांमध्ये सीसीटीव्ही प्रकल्पांना प्राधान्यक्रम देण्याबाबतच्या धोरणास मान्यता देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवत (ता.दौंड,जि.पुणे) येथील पोलीस ठाण्याचे विभाजन करुन पाटस या ठिकाणी नवीन पोलीस स्टेशन सुरु करण्याबाबत**

**(१०) ४२००३ (०७-०४-२०२२). ॲड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवत (ता.दौंड, जि.पुणे) येथील पोलीस ठाण्याचे विभाजन करुन पाटस या ठिकाणी नवीन पोलीस स्टेशन सुरु करण्याबाबत तसेच उक्त पोलीस स्टेशनच्या इमारती पुरेशा नसल्याने नवीन बांधकामासाठी निधी मिळण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक २० ऑक्टोबर, २०१८ व दिनांक २० जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांनीही सदर नवीन पोलीस स्टेशन सुरु करण्याबाबत त्यांच्या क्र.पशा-१/पाटस पो.स्टे./१९१५३/२०१८, पुणे दिनांक २७.०९.२०१८ या पत्रान्वये शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रस्ताव पोलीस महासंचालक कार्यालयाने सादर केलेल्या महाराष्ट्र राज्य पोलीस दलाचा सुधारित आकृतीबंधामध्ये सदर नवीन पोलीस स्टेशन निर्माण करण्याबाबतच्या प्रस्तावाचा समावेश करण्यात असून सुधारित आकृतीबंध वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रस्तावास मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०३-२०२३) :**(१),(२),(३) व (४)
महाराष्ट्र राज्य पोलीस दलाकरीता दुसऱ्या टप्प्यात २९ नवीन पोलीस स्टेशन निर्माण करण्यासाठी पोलीस महासंचालक कार्यालयाने सादर केलेल्या प्रस्तावामध्ये यवत (ता.दौंड, जि.पुणे) येथील पोलीस ठाण्याचे विभाजन करून नवीन पाटस पोलीस ठाणे निर्माण करण्याबाबतच्या प्रस्तावाचा समावेश आहे.
तसेच,पोलीस महासंचालक कार्यालयाने सादर केलेला महाराष्ट्र राज्य पोलीस दलाचा सुधारित आकृतीबंध अहवालामध्येही पाटस पोलीस ठाणे निर्माण करणेबाबतचा समावेश होता. उपरोक्त आकृतीबंधाचा प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला असता, वित्त विभागाने उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने पोलीस महासंचालक कार्यालयाकडून दि.१७/८/२०२१ च्या पत्राव्दारे सुधारित आकृतीबंध प्रस्ताव मागविण्यात आला.
त्याप्रमाणे पोलीस अधीक्षक,पुणे ग्रा. यांचे कार्यालयाच्या आकृतीबंध प्राप्त झाला आहे.
सदर आकृतीबंधाच्या प्रस्तावाबाबत वित्त विभागाव्दारे दि.१८/१०/२०२२ रोजी आयोजित उपसमितीच्या बैठकीत मान्यता दिली आहे. उच्चस्तरीय समितीच्या मान्यतेनंतर पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड शहरातील ग्रामीण व शहरी पोलीस ठाण्याच्या हद्दीवरुन अनेक वेळा वाद होऊनही तक्रारीची नोंद करण्यात येत नसल्याबाबत**

**(११) ४२५१९ (११-०४-२०२२). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड शहरातील ग्रामीण व शहरी पोलीस ठाण्याच्या हद्दीवरुन अनेक वेळा वाद होत असल्याने काही प्रसंगी वाद विकोपाला जावुन तक्रारीची नोंद करण्यात येत नसल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त शहरातील भाग्यनगर पोलिस ठाणे तसेच विमानतळ ठाण्याच्या हद्दीत वाद होत असल्याने या प्रकरणाची चौकशी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०४-२०२३) :**(१) नांदेड जिल्हयातील सर्व पोलीस ठाणेंच्या प्रभारी अधिकारी व उपविभागीय पोलीस अधिकारी यांना पोलीस ठाणेमध्ये प्राप्त प्रत्येक तक्रारीची दखल घेणेबाबत स्पष्ट सूचना पोलीस अधीक्षक,नांदेड यांनी दिल्या आहेत. तसेच, पोलीस अधीक्षक,नांदेड यांचे कार्यालयास माहे जानेवारी २०२२ या महिन्यात पोलीस ठाणेच्या हद्दीच्या कारणांवरून कोणत्याही व्यक्तीची तक्रार घेण्यात आली नसल्याची तक्रार प्राप्त नाही.
(२) पोलीस ठाणे, भाग्यनगर व पोलीस ठाणे, विमानतळ यांचेमध्ये हद्दीवरून सध्या कोणताही वाद नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही

---

**मौ.विरुळ (ता.आर्वी), मौ.विरुळ (ता.आष्टी), मौ.अंतोरा व मौ.साहुर तसेच मौ.बांगडापूर (ता.कारंजा, जि.वर्धा) येथे नवीन पोलीस चौकी स्थापन करण्याबाबत**

**(१२) ४३६३८ (१२-०४-२०२२). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आर्वी विधानसभा मतदार संघाच्या टोकालगत असलेल्या मौ.विरुळ (ता.आर्वी), मौ.विरुळ (ता.आष्टी), मौ.अंतोरा व मौ.साहुर तसेच मौ.बांगडापूर (ता.कारंजा, जि.वर्धा) येथे नव्याने पोलीस चौकी निर्माण करण्याची लोकप्रतिनिधी यांनी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त गावे जिल्हापरिषद सर्कलची मोठी गावे असून प्रत्येक गावाच्या परिसरात २० ते २५ खेड्यांचा समावेश असून नागपूर-अमरावती सिमेलगत असल्यामुळे चोर मार्गाने दारुचा अवैध पुरवठा केल्या जातो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी पोलीस चौकी निर्माण केल्यास मोठ्या प्रमाणात होणारे अवैध गैरकारभारास आळा बसून पोलीस चौकी निर्माण करणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने नवीन पोलीस चौकी स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०४-२०२३) :** (१) व (२) होय.
पोलीस स्टेशन पुलगांव अंतर्गत येत असलेले मौजा विरुळ (ता.आर्वी),पोलीस ठाणे आष्टी अंतर्गत येत असलेले मौजा अंतोरा व मौजा साहूर, तसेच पोलीस ठाणे,कारंजा अंतर्गत येत असलेले मौजा बांगडापूर (ता.कारंजा,जि.वर्धा) येथे सन २०१९ ते २०२१ पर्यंत खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे गुन्हे नोंद आहेत .

| अ) मौजा विरुळ,ता.आर्वी- | | | |
|---|---|---|---|
| २०१९ ते २०२१ | भाग १ ते ५ | भाग ६ | दारुबंदी |
| सरासरी | ०८ | ०५ | ०६ |
| ब) मौजा साहूर,ता.आष्टी- | | | |
| सरासरी | ०६ | ०५ | १८ |
| क) मौजा अंतोरा, ता.आष्टी- | | | |
| सरासरी | ०३ | ०३ | ०४ |
| ड) मौजा बांगडापूर,ता.कारंजा,जि.वर्धा- | | | |
| सरासरी | ०२ | ०१ | ०२ |

(३) व (४) आर्वी तालुक्यातील मौजा विरुळ, आष्टी तालुक्यातील मौजा अंतोरा व मौजा साहुर, तसेच कारंजा तालुक्यातील मौजा बांगडापूर या गावांची लोकसंख्या ५ हजारापेक्षा कमी आहे व तेथे कायदा व सुव्यवस्थेचा विशेष प्रश्न नाही.
तसेच, मागील ३ वर्षाच्या भाग १ ते ५ च्या गुन्ह्यांची सरासरी ही २५ पेक्षा कमी असून, तेथे मोठी दंगली व वाद घडलेला नाही. म्हणून, तेथे पोलीस चौकीची सध्या आवश्यकता वाटत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रामनगर (जि.चंद्रपूर) येथील पोलीस ठाण्याचे विभाजन करुन शास्त्रनगर पोलीस स्टेशनची निर्मिती करण्याबाबत

**(१३) ४३८५८ (११-०४-२०२२). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रामनगर (जि.चंद्रपूर) येथील पोलीस ठाण्याच्या कामाची व्याप्ती व हद्द मोठी असल्यामुळे तसेच कमी अधिकारी व अल्प कर्मचाऱ्यांमुळे दिवसेंदिवस गुन्हेगारी वाढल्यामुळे पोलीस ठाण्याचे विभाजन करुन शास्त्रनगर पोलीस स्टेशनची निर्मिती करण्याचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक (डीजी) यांनी कार्यालयामार्फत शासनाकडे गेल्या चार-पाच वर्षांपूर्वी पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वित्त विभागाच्या दिनांक ०४ मे, २०२० रोजीच्या शासन निर्णयानुसार नवीन पदे निर्माण करणे तसेच दिनांक २५ मे, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय विभाग आकृतीबंध अंतिम मंजूरी करुन घेणार नाही, तोपर्यंत त्या विभागांना नवीन पदभरती करण्यात येणार नाही इत्यादी कारणे देऊन प्रस्तावास दिनांक ३१ मार्च, २०२२ पर्यंत तात्पुरती स्थगिती देण्यात आल्याचे सहायक पोलीस महानिरीक्षक (नि. व स.), पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक १२ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राव्दारे पोलीस अधीक्षक, चंद्रपूर यांना कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर स्थगिती उठविल्यानंतर रामनगर पोलीस ठाण्याचे विभाजन करुन शास्त्रीनगर पोलीस ठाण्याची निर्मिती करुन अधिकारी व कर्मचा-यांच्या नियुक्त्या करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०४-२०२३) :** (१), (२) व (३) पोलीस ठाणे रामनगरचे विभाजन करुन व शास्त्रीनगर पोलीस चौकीचे रुपांतर करुन नवीन शास्त्रीनगर पोलीस ठाणे निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस महासंचालक कार्यालयाच्या दि.१३/९/२०२२ च्या पत्रान्वये शासनास प्राप्त झाला. सदर प्रस्तावावर वित्त विभागाने उपस्थित केलेल्या मुद्दयांची माहिती सादर करणेबाबत पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना दि.१/११/२०२२ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.
तसेच पोलीस अधिक्षक चंद्रपूर या घटकाच्या आकृतीबंधाचा प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन आहे. वित्त विभागाच्या मान्यतेनंतर पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालिकेकडे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी गृह विभागाने प्रस्ताव सादर केल्याबाबत**

**(१४) ४४५६८ (०६-१०-२०२२). श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने मुंबई व मुंबई उपनगरात दहा हजारांपेक्षा अधिक सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा निर्णय सन २०१९ या कालावधीत घेतला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान किती सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले, तसेच दुसऱ्या टप्प्यातील किती सीसीटीव्ही बसविणे शिल्लक आहे,
(३) असल्यास, सदर काम करताना चर खोदण्यावरील शुल्क माफ करण्याबाबतचा प्रस्ताव तत्कालीन गृह विभागाने मुंबई महानगरपालिकेकडे सन २०२० या कालावधीत सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रस्तावास मुंबई महानगरपालिकेने मंजूरी दिली आहे काय, तसेच उर्वरीत सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे काम पूर्ण होण्यास अजून किती कालावधी अपेक्षित आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०३-२०२३) :**(१) व (२) होय, मुंबई शहर सीसीटीव्ही प्रकल्पाचा पहिला टप्पा पूर्ण झाला असून दुसऱ्या टप्प्याचे काम चालू आहे.
(३) व (४) मुंबई सीसीटीव्ही प्रकल्पाच्या (फेज-२) खोदकामाचे (Trenching) शुल्क भरण्यापासून शासनास सूट मिळण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेला निर्देश/सूचना देण्याकरीता नगर विकास विभागास विनंती करण्यात आली आहे. उर्वरीत सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेने खोदकाम करण्यास मंजुरी दिल्यानंतर ६ महिन्यांचा कालावधी आवश्यक आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात पोलीस पाटलांची रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया सुरु करण्याबरोबरच पोलीस पाटलांचे मानधन वेळेत अदा करण्याबाबत

**(१५) ४५०३४ (३१-१०-२०२२). श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.राजु पारवे (उमरेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पोलीस पाटीलांची रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया सुरु करण्याबरोबरच पोलीस पाटीलांचे मानधन वेळेत अदा करण्याचे निर्देश तत्कालीन गृह मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या बैठकीत देण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पोलीस पाटीलांच्या अन्य मागण्यासंदर्भात चर्चा करण्यात आल्यानुसार पोलीस पाटीलांना चतुर्थ श्रेणीचा दर्जा देण्याबाबत शासनाचे धोरण आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०३-२०२३) :** (१) पोलीस पाटलांच्या विविध मागण्यांसंदर्भात तत्कालीन मा. मंत्री (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली दि. २२/०२/२०२२ रोजीच्या आयोजीत बैठकीतील निर्देशानुसार महसूल व वन विभागाने, शासनपत्र दि. ०२/०८/२०२२ अन्वये राज्यातील सर्व जिल्ह्याधिकारी यांना संबंधित जिल्हयातील पोलीस पाटील रिक्त पदे तातडीने भरण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश दिले असून जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत त्यानुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच पोलीस पाटलांचे मानधन, प्रवासभत्ता व दैनिक भत्ता वेळेत देण्याबाबत सर्व पोलीस घटक कार्यालयांना सुचना देण्यात आलेल्या आहेत.

(२) व (३) पोलीस पाटील हे मानसेवी पद असून त्यांना चतुर्थ श्रेणीचा दर्जा देण्याबाबतची बाब शासनस्तरावर सध्या विचाराधीन नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदेड शहरासाठी स्वतंत्र पोलिस आयुक्तालय स्थापन करण्याबाबत

**(१६) ४५४१८ (३१-१०-२०२२). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड महानगर आणि जिल्ह्यातील परिस्थितीचा विचार करुन नांदेड शहरासाठी स्वतंत्र पोलिस आयुक्तालय स्थापन करण्याची घोषणा माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान तत्कालीन गृह मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घोषणेनुसार कधीपर्यंत स्वतंत्र पोलिस आयुक्तालयाच्या स्थापनेच्या कामास सुरु होणे अपेक्षित आहे, तसेच त्याकरिता किती निधीची तरतूद करण्यात आली आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०३-२०२३) :** (१) होय.

(२) व (३) याबाबत पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयास दि.१८/०५/२०२२ रोजीच्या पत्राव्दारे सदरहू प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यासंदर्भात पोलीस अधीक्षक, नांदेड यांनी दि.१३/६/२०२२ च्या पत्राव्दारे उपरोक्त प्रस्ताव पोलीस महासंचालक कार्यालयास पाठविण्यात आला होता. परंतू त्यामध्ये काही त्रूटी असल्याने त्याची पुर्तता करणेबाबत पोलीस महासंचालक कार्यालयाने पोलीस अधीक्षक, नांदेड यांना दि.१२/७/२०२२ च्या पत्राव्दारे कळविण्यात आले आहे.

म्हणून, उपरोक्त प्रस्ताव अद्याप शासनास अप्राप्त आहे. तो प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील प्रत्येक पोलिस स्थानकात एक स्वतंत्र पोलिस अधिकारी नियुक्त करण्याबाबत

**(१७) ४६३८७ (२७-१०-२०२२). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गृहनिर्माण संस्थामधील रहिवाश्यांच्या तक्रारी सोडविण्यासाठी मुंबईतील प्रत्येक पोलिस स्थानकात एक स्वतंत्र पोलिस अधिकारी नियुक्त करण्याची घोषणा मुंबईच्या पोलिस आयुक्तांनी दिनांक १६ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित पोलिस अधिका-यांकडे रहिवाशांनी कोणत्या स्वरुपाच्या तक्रारी दाखल केल्या आहे, तसेच सदर निर्णयाचे स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, सदरहू मुंबईतील कोणकोणत्या पोलिस स्थानकांमध्ये स्वतंत्र पोलिस अधिकारी नियुक्त करण्यात आले आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०३-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या दि.१७.०५.२०२२ च्या आदेशान्वये पोलीस निरीक्षक (जनसंपर्क) या अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली आहे.
(२) रहिवाश्यांनी संस्थेची निवडणूक, पदाधिकारी यांनी केलेला अपहार/गैरव्यवहार, अनधिकृत बांधकाम/कब्जा करणे, शिवीगाळ, भांडणे, मद्यपान करणे, ऐच्छिक देणगीची मागणी, विकासकाने कॉर्पस फंड व भाडे न देणे, पार्किंग समस्या इत्यादी विविध प्रकारच्या तक्रारी केल्या आहेत.
(३) व (४) बृहन्मुंबईतील सर्व पोलीस ठाणेमध्ये पोलीस निरीक्षक (जनसंपर्क) यांची नियुक्ती करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोनवळा-ऊमराई-केंद्रेवाडी-धावडी (ता.अंबाजोगाई, जि.बीड) येथील गावे अंबाजोगाई ग्रामीण पोलीस स्टेशनला जोडण्याबाबत

**(१८) ४७६३२ (२८-१०-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोनवळा-ऊमराई-केंद्रेवाडी-धावडी (ता.अंबाजोगाई, जि.बीड) या गावांना पोलीस स्टेशन धारुर असून पोलीस स्टेशनला कोर्ट माजलगाव तसेच कोपरा, अंजनपूर, तटबोरगाव, आपेगाव, सोमनाथ बोरगाव, हिवरा ही गावे अंबाजोगाई तालुक्यात असून सदर गावांना पोलीस स्टेशन युसुफवडगाव असल्याने त्या पोलीस स्टेशनला कोर्ट केज आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त धारुरचे अंतर २५ किलोमीटर असून माजलगावचे अंतर ६० किलोमीटर आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर गावे अंबाजोगाई तालुक्यात असतानाही सदर गावातील नागरिकांना पोलीस स्टेशन व न्यायालयीन कामासाठी दुसऱ्या तालुक्यात जाने अडचणीचे ठरत आहे, तसेच पोलीस स्टेशन लांब असल्याने पोलिसांना गुन्हेगारी कार्यावर लक्ष ठेवणे अवघड झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त गावापासून अंबाजोगाईचे अंतर जवळ असल्याने अंबाजोगाई ग्रामीण पोलीस स्टेशनला जोडण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी तत्कालीन गृह मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक ३१ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली होती, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याप्रकरणी उपरोक्त किती गावे अंबाजोगाई ग्रामीण पोलीस स्टेशनला जोडली आहेत वा जोडण्यात येणार आहेत तसेच याबाबत चौकशी करुन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०३-२०२३) :** (१), (२), (३), (४) व (५) होय,
पोलीस ठाणे,अंबाजोगाई ग्रामीण यांना सदरहू गांवे जोडण्याबाबत संबधित ग्रामपंचायत यांचा ठराव, ना-हरकत,तसेच तहसीलदार,अंबाजोगाई व केज, तसेच जिल्हाधिकारी,बीड यांना ना-हरकतबाबत पोलीस महासंचालक कार्यालयाने पत्रव्यवहार केला आहे. त्यापैकी केवळ ग्रामपंचायत मौजे सोनवळा यांनी ठराव व ना-हरकत प्रमाणपत्र दिले असून,उर्वरित उमराई-केंद्रेवाडी-धावडी,तसेच कोपरा, अंजनपूर, तटबोरगाव,आपेगाव,सोमनाथ,बोरगाव,हिवरा५४ या गावातील ग्रामपंचायतींना पत्रव्यवहार करूनही त्या गावांच्या ग्रामपंचायतींनी ठराव व ना-हरकत प्रमाणपत्र दिले नाही.
पोलीस ठाणे, युसुफवडगांव हद्दीतील कोणतीही गावे पोलीस ठाणे, अंबाजोगाई यांचे हद्दीला जोडलेली नाहीत.
तथापि, उक्त गावे पोलीस ठाणे,अंबाजोगाई ग्रामीण ला जोडण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**म्हाडाच्या मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाने विकासकास भाडेतत्वावर दिलेल्या गाळ्याबाबत**

**(१९) ४८१७० (३१-१०-२०२२). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) म्हाडाच्या मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाने मुंबईतील सुमारे ४१ विकासकांना भाडेतत्वावर ३,८२० गाळे ताब्यात दिले असून त्यापैकी केवळ ५०७ गाळे विकासकांनी मंडळाकडे परत केले आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील २० पेक्षा जास्त वर्षापासून सुमारे ३,३२२ गाळे विकासकांच्या ताब्यात आहेत व त्या गाळयांची सुमारे २५० कोटी रूपयांची रक्कम विकासकांनी थकीत ठेवली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी विकासकांच्या ताब्यातील गाळे परत घेण्यासाठी व थकबाकी वसूल करण्यासाठी मंडळाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०४-२०२३) :** (१) मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत एकूण ४२ खाजगी विकासकांना ४२१२ संक्रमण गाळे वितरीत करण्यात आले आहेत. त्यापैकी १४२९ संक्रमण गाळे मंडळास परत करण्यात आले असून सद्य:स्थितीत २७८३ गाळे विकासकांच्या ताब्यात आहेत.
(२), (३) व (४) विकासक थकीत भाडे अदा करण्याबाबत अनियमीतता दिसून आल्याने विकासकांकडील संक्रमण गाळयापोटी थकीत भाड्याच्या वसूलीकरीता विकासकाविरूध्द लवाद (Arbitration) कायद्यामधील कलम ९ नुसार पिटिशन दाखल करण्याबाबत संबंधित पॅनल वकिल यांना म्हाडाकडून कळविण्यात आले आहे.त्यानुसार पॅनल वकिल यांमार्फत १२ विकासकंना नोटिस बजावण्यात आली आहे.त्यापैकी २ विकासका विरूध्द याचिका दाखल करण्याची कार्यवाही सुरू आहे. तसेच, एकूण २२ थकबाकीदार विकासकांविरूध्द खेरवाडी पोलीस ठाणे येथे म्हाडाकडून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी काही विकासकांनी मा.उच्च न्यायालयामध्ये दावे दाखल केले असून सदर दावे मा.उच्च न्यायालयामध्ये प्रलंबित आहेत.

विकास नियंत्रण नियमावली ३३ (७) अंतर्गत थकबाकी अदा न करणाऱ्या एकूण २४ विकासक यांना काम थांबा नोटीस (Stop work notice) देण्यात आली आहे. तसेच एस.आर.ए. विकास नियंत्रण नियमावली ३३ (१०) अंतर्गत

१२ विकासकांना संक्रमण गाळ्यापोटी थकीतभाडे भरणा करीत नाहीत तोपर्यंत इतर परवानग्या देण्यात येऊ नयेत व त्यापैकी ५ विकासक पुनर्विकास करीत असलेल्या प्रकल्पास काम थांबवा नोटीस देण्यात आली आहे.

विकासकांना काम थांबवा नोटीस दिल्यानंतर विकासकांकडून माहे एप्रिल २०१६ ते माहे ऑक्टोबर २०२२ या कालावधीत रू.१९१.२४ कोटी इतक्या रकमेची वसूली विकासकांकडून करण्यात आलेली असून माहे ऑक्टोबर २०२२ अखेरपर्यंत रु.१४०.८२ कोटी इतकी रक्कम विकासकांकडे थकित आहे.

---

### तेरणा नदीचे खोलीकरण व सरळीकरण कामास परवानगी देण्याबाबत

**(२०) ४८५७१ (१२-१०-२०२२). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निम्न तेरणा प्रकल्प माकणी (ता लोहारा, जि.उस्मानाबाद) या प्रकल्पाखालील माकणी ते शहाजनी औराद (ता. निलंगा) पर्यन्त नदीचे खोलीकरण व सरळीकरण कामास परवानगी देण्याबाबत औसा विधानसभा स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जलसंपदा मंत्री यांच्याकडे माहे मार्च, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन प्रकल्पास परवानगी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०४-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) उपरोक्त प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने कालवा सल्लागार समितीच्या बैठकीतील निर्देशानुसार सदर कामासाठी DPDC मधून रू.२.०० कोटी निधी उपलब्ध करून देण्यात येत असून त्यानुषंगाने क्षेत्रिय स्तरावर कार्यवाही प्रगतीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पोलीस भरती प्रक्रियेमध्ये एनसीसीच्या परीक्षेच्या विद्यार्थ्यांना गुण देण्याबाबतचा शासन निर्णय रद्द करण्याबाबत

**(२१) ४८९१३ (३०-१०-२०२२). श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोलीस भरती प्रक्रियेमध्ये उमेदवारांना एनसीसीच्या परीक्षेच्या गुणांनुसार ५ टक्के, ३ टक्के व २ टक्के गुण देण्याचा शासन निर्णय आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण भागातील उमेदवारांना गावपातळीवर १२ पर्यंतचे शालेय शिक्षण झाल्यामुळे आणि पोलीस भरती प्रक्रियेची शैक्षणिक अर्हता १२ वी असल्याने अनेक ग्रामीण शाळेमध्ये एनसीसीचे शिक्षण दिले जात नसल्याने अनेक विद्यार्थी या गुणांपासून वंचित राहतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त एनसीसीच्या विद्यार्थ्यांना गुण देण्याची पद्धत रद्द करुन जास्तीत जास्त ग्रामीण भागातील बेरोजगार विद्यार्थ्यांना पोलीस भरतीत समाविष्ट करुन घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०५-२०२३) :** (१) होय,

शासन आदेश दि.०२.०३.२०२२ अन्वये राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी) “क”,”ब” व “अ” प्रमाणपत्र धारण करणा-या उमेदवारांना पोलीस शिपाई भरती परीक्षेच्या एकूण गुणांच्या अनुक्रमे ५%,३% व २% अधिकच्या गुणासाठी पात्र ठरविण्यात आले होते.

(२) व (३) शासन आदेश दि.२०.१०.२०२२ अन्वये पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) (दुसरी सुधरणा)नियम, २०२२ विहित केले असून त्यानुसार उपरोक्त दि.०२.०३.२०२२ रोजीच्या आदेशामध्ये सुधारणा करुन केवळ राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी) "क" प्रमाणपत्र धारण करणा-या उमेदवारांना ५ अधिकच्या गुणांसाठी पात्र ठरविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे भूगाव, (ता.मुळशी, जि.पुणे) येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज जलाशयाभोवती सुशोभिकरण करणेबाबत**

**(२२) ४८९३५ (१४-१०-२०२२). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे भूगाव (ता.मुळशी, जि.पुणे) येथे जलसंपदा विभागाचा श्री छत्रपती शिवाजी महाराज तलाव असून सदर तलावातून मौजे भूगाव व भूकुम या गावांना पिण्याच्या पाण्याची योजना कार्यान्वित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तलावाच्या सभोवताली स्वच्छतेचा अभाव असल्याने या तलावाचे सुशोभिकरण करण्याबाबत ग्रामस्थांनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशीकरून तलावाचे सुशोभिकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०५-२०२३) :** (१) होय.
(२) नाही.
(३) तलावभोवतीच्या परिसरातील स्वच्छता ठेवणे ही संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था म्हणेजच ग्रामपंचायतीची जबाबदारी आहे. सुशोभिकरणाची कामे जलसंपदा विभागामार्फत केली जात नाही. पर्यावरण विभागाचे शासन निर्णय क्र.इएनव्ही-२००८/प्र.क्र.६९/तां.क्र.३, दि.२७.०८.२००८ मधील मार्गदर्शक सुचनांनुसार सदर कामे स्थानिक स्वराज्य संस्थामार्फत करता येतात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तेल्हार (जि.अकोला) तालुक्यात पुरेसा निधी अभावी शैक्षणिक, औद्योगिक व आरोग्य सुविधांचा अभाव असल्याबाबत**

**(२३) ४८९८७ (१४-१०-२०२२). श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर), श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तेल्हार (जि.अकोला) तालुक्यात पुरेसा निधी अभावी शैक्षणिक, औद्योगिक व आरोग्य सुविधांचा अभाव असल्याने विकासापासून वंचित राहवे लागत असल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तालुक्यामध्ये सन २०११ च्या जनगणनेनुसार पुरेशा सेवा सुविधा उपलब्ध नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त तालुक्यात लोकसंख्येच्या प्रमाणे शैक्षणिक, औद्योगिक, आरोग्याच्या सेवा सुविधा देण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही वा उपाययोजना करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०५-२०२३) :** (१) (२) व (३) तेल्हारा (जि.अकोला) तालुक्यात शैक्षणिक, औद्योगिक व आरोग्य सुविधा उपलब्ध आहेत. तेल्हारा तालुक्यात १ ग्रामीण रुग्णालय, ४ प्राथमिक आरोग्य केंद्रे व २५ उपकेंद्रे कार्यरत असून त्यांच्या मार्फत पुरेशा आरोग्य सुविधा पुरविण्यात येत आहेत. सदर तालुक्यात सन २०११ च्या जनगणनेनुसार आरोग्य केंद्र व उपकेंद्र निर्माण करण्याची कार्यवाही सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत सुरू आहे. सदर तालुक्यात लघु औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यात आले असून तेथे सामूहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत औद्योगिक घटकांना ८० टक्के पर्यंत प्रोत्साहने लागू आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहरातील वीज ग्राहकांना स्मार्ट वीज मीटर पुरविण्याबाबत

**(२४) ४९७१६ (२०-०१-२०२३). श्री.चेतन तुपे (हडपसर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहर आणि परिसरातील वीज ग्राहकांचे सुरु असलेले मीटर बदलून त्याजागी स्मार्ट मीटर्स बसविण्याचा निर्णय महावितरणच्या वतीने घेण्यात आला आहेत तसेच महावितरण कडे पुरेसे वीज मीटर उपलब्ध नसल्याने माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान नव्याने वीजपुरवठ्याची मागणी करणाऱ्या नागरिकांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मीटर्ससाठी लागणारी रक्कम भरण्याबाबत ग्राहकांची मोठ्या प्रमाणात नाराजी असल्यामुळे महावितरणाच्यावतीनेच पूर्वीच्या मीटरच्या मोबदल्यात नवीन मीटर द्यावेत अशा स्वरुपाची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे हे ही खरे काय,

(३) असल्यास, पुणे शहरात महावितरण कडे नवीन मीटर साठी माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान नोंदवण्यात आलेली मागणी आणि प्रत्यक्षातील मीटर पुरवठा यांचा तपशील काय आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकणी शासनाने चौकशी करुन ग्राहकांना कोणतेही शुल्क न आकारता स्मार्ट मीटर उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०४-२०२३) :** (१) वीज ग्राहकांचे मीटर बदलून त्याऐवजी स्मार्ट मीटर बसविण्याबाबत सुधारित वितरण क्षेत्र योजनेनुसार महावितरणतर्फे ग्राहकांचे वीज मीटर बदलून स्मार्ट मीटर बसविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच महावितरणतर्फे नोव्हेंबर-२०२२ वा त्या दरम्यान पुणे परिमंडळासाठी मुबलक मीटरची उपलब्धता करुन देण्यात आल्याने ग्राहकांची गैरसोय झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२) हे खरे नाही.

सदर स्मार्ट मीटर बसविण्यासाठी ग्राहकांकडून कोणतेही अतिरिक्त शुल्क आकारण्यात येत नाही.

(३)पुणे परिमंडळात मे महिन्याच्या आरंभी ९,१३४ नग इतक्या मीटरचा साठा उपलब्ध होता. त्यानंतर अतिरिक्त १२,५०० नवीन मीटरचा साठा या क्षेत्रासाठी उपलब्ध करुन देण्यात आला असून एकूण २१,६३४ नग इतक्या मीटरचा साठा मे महिन्यात उपलब्ध होता. पुणे परिमंडळाअंतर्गत मे-२०२२ या महिन्यात एकूण १६०५७ इतक्या नवीन वीज जोडण्याची मागणी नोंदवली गेली व १२,२३७ इतक्या नवीन वीज जोडण्या देऊन महिन्या अखेरीस १२,१३१ नग इतक्या मीटरचा साठा शिल्लक होता.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्हयाला जिल्हानियोजनसाठी ४२५ कोटी रुपयाचा निधी मंजूर करण्यात आल्याबाबत

**(२५) ५००९३ (०९-०३-२०२३). श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयाला यावर्षी ४२५ कोटी रुपयाचा निधी मंजूर झाला असून यापैकी गाभा क्षेत्रासाठी २६२ कोटी

४३ लाख रुपये तर बिगर गाभा क्षेत्रासाठी १३० कोटी ५६ लाख रुपयाचा निधी देण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आतापर्यंत फक्त १० कोटी ५५ लाख रुपयांच्या कामांनाच प्रशासकीय मान्यता मिळालेली असल्यामुळे माहे मार्च २०२३ पर्यंत ४२५ कोटी रुपये खर्च करण्याचे आव्हान जिल्हा प्रशासनासमोर आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्राप्त झालेला निधी खर्च करण्यासंदर्भात शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०४-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४)
जिल्हा वार्षिक योजना (सवसाधारण) सन २०२२-२३ अंतर्गत अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या ४२५.०० कोटी निधीपैकी ४१४.४२ कोटी
निधी वितरीत करण्यात आला होता. मार्च, २०२३ अखेरपर्यंत ९६.५३ टक्के निधी खर्च झाला आहे.

---

**मोहाडी नलेश्वर (ता.सिंदेवाही,जि.चंद्रपूर) येथील उमा नदिवरील पुलाचे काम निधी अभावी बंद असल्याबाबत**

**(२६) ५०५५० (१८-०१-२०२३). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोहाडी नलेश्वर (ता.सिंदेवाही, जि.चंद्रपूर) जवळील उमा नदिवर मोठया पुलाचे बांधकाम करण्यासाठी सन २०२०-२१ मध्ये आदिवासी विभागाच्या अर्थसंकल्पात प्रशासकीय मंजूरी मिळालेली असतानाही आदिवासी विकास विभागाकडून सार्वजनिक बांधकाम विभाग चंद्रपूर मंडळ यांच्याकडे अद्यापही या कामाचा निधी मिळाला नसल्यामुळे सुरु असलेले बांधकाम बंद केल्याचे दिनांक ३० ऑगस्ट २०२२ रोजी वा सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पुलाच्या बांधकामास सार्वजनिक बांधकाम विभाग चंद्रपूर मंडळ यांनी ८ कोटी रूपयांचा निधी उपलब्ध होण्यासाठी आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी लोकप्रतिनिधी यांनी माहे ऑगस्ट २०२२ मध्ये अदिवासी विकास मंत्री निवेदन दिले, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, कामासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**डॉ. विजयकुमार गावीत (१२-०५-२०२३) :**
(१) (२) व (३) हे खरे आहे.
(४) सन २०२२-२३ या वित्तीय वर्षात लेखाशिर्ष ५०५४ ५११७ अंतर्गत प्रस्तुत कामासाठी रु. ७.०० कोटी इतका निधी अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ चंद्रपूर यांना उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कन्नड तालुक्यातील (जि. औरंगाबाद)देवळाना २१० KV लिंक लाईन गारज मार्गे सिंधी नाला शिवुर सबस्टेशनला जोडण्यासाठी लिंक लाईनचे मंजुर कामास विलंब होत असल्याबाबत**

**(२७) ५०८०३ (१८-०१-२०२३). श्री.रमेश नानासाहेब बोरनारे (सर) (वैजापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देवळाना (ता. कन्नड , जि. औरंगाबाद) येथील २१० KV लिंक लाईन गारज मार्गे सिंधी नाला शिवुर सबस्टेशनला जोडण्यासाठी लिंक लाईनचे काम मंजुर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर लिंक लाईनच्या कामाचे टेंडर भारत इलेक्ट्रिकल या कंपनीस देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील कंपनीने कार्यारंभ आदेश मिळाल्यानंतर प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यास विलंब केला होत असल्यास त्यांची कारणे काय आहे,
(४) असल्यास, लिंक लाईनच्या कामास विलंब होत असल्यामुळे शेतकऱ्यांना विदयुत पुरवठा सुरळीत होण्यासाठी शासनाने कोणती पर्यायी उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०४-२०२३) :** (१) हे अंशत : खरे आहे.
सदर काम हे २१० केव्ही लिंक लाईनचे नसून ३३ केव्ही लिंक लाईनचे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
मे. भारत इलेक्ट्रिकल यांना उच्चदाब वितरण प्रणाली योजनेअंतर्गत निविदेमार्फत उपकेंद्र उभारणीकरिता कामे देण्यात आली होती. सदर लिंक लाईनचे काम या निविदेच्या स्कोप मध्ये अंतर्भूत नव्हते. परंतु, मुळ निविदेतील वाहिनीची व्याप्ती शिल्लक असल्याकारणाने व मे. भारत इलेक्ट्रिकल यांनी सदर लिंक लाईनचे काम करण्याकरिता सकारत्मकता दर्शविल्याने त्यांना सदर काम करण्यास अधीक्षक अभियंता (पा.आ.) यांनी सूचित केले होते.
(३)मे. भारत इलेक्ट्रिकल यांनी उच्चदाब वितरण प्रणाली योजनेअंतर्गत टी-१० निविदेतील उपकेंद्र उभारण्याची कामे पुर्ण करण्यात आले असून, गारज ते शिऊर बंगला (सिंधी नाला) व भायगाव ते खंडाळा येथे ३३ केव्ही लिंक लाईनचे काम करण्यास सूचित करण्यात आल्यानंतर मे. भारत इलेक्ट्रिकल यांनी भायगाव ते खंडाळा या लिंक लाईनचे काम पूर्ण केले आहे. तसेच गारज ते शिऊर बंगला (सिंधी नाला) लिंकलाईनच्या कामाचा सर्व्हे करताना त्यांना वाहिनीचे काम करण्याकरिता स्थानिक लोकांनी प्रखर विरोध दर्शविल्या कारणाने मे. भारत इलेक्ट्रिकल यांनी या कामास सुरुवात केली नाही.
(४) मे. भारत इलेक्ट्रिकल यांनी लिंक लाईनचे काम करण्याकरिता स्थानिक लोकांचा प्रखर विरोध तसेच वाहिनी उभी करण्याकरिता येणारे ROW मुळे सदर लिंकलाईनचे काम पूर्ण करण्याकरिता असमर्थता दर्शविली आहे. सदर लिंक लाईनचे काम हे सुधारित वितरण क्षेत्र (RDSS) योजनेमध्ये अंतर्भुत करण्यात आले आहे.निविदा प्रक्रिया पूर्ण होताच सदर वाहिनीचे काम पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

१३२ केव्ही वैजापूर उपकेंद्रातून ३३ केव्ही लोणी वाहिनी अतिभारीत होऊन लोणी परिसरातील शेतकऱ्यांना कमी विद्युत दाबाने वीज पुरवठा होत असल्याचे निदर्शनास आले होते. त्याअनुषंगाने ३३ खंडाळा या लिंक लाईनचे काम पूर्ण करुन ३३/११ केव्ही खंडाळा उपकेंद्राचा १० एमव्हीए भार कमी करण्यात आला आहे. तसेच उपकेंद्राकरिता ३३ केव्ही लाईनची अतिरिक्त पर्यायी व्यवस्था उपलब्ध झाली आहे. तसेच ३३/११ केव्ही भादली उपकेंद्रातर्गत ५ एमव्हीए क्षमतेचे सोलार निर्मिती केंद्र कार्यान्वित करण्यात आले आहे. त्यामुळे ३३ केव्ही लोणी वाहिनीवरील अतिरिक्त भार कमी होऊन, वाहिनी अतिभारीत असल्याच्या समस्येचे निराकरण झाले आहे.
तसेच महापारेषण कंपनीने १३२ केव्ही वैजापूरउपकेंद्र येथे कमी विद्युत दाबाची समस्या सोडवण्यासाठी ४५ एमव्हीएआर क्षमतेचे कॅपॅसिटर कार्यान्वित केले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक जिल्ह्यात शेतीपंपासाठी होणारा वीज पूरवठा अखंडित करण्याबाबत

**(२८) ५०८७७ (१९-०१-२०२३). श्री.दिलीपराव बनकर (निफाड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यात शेती पंपासाठी रात्रीच्या वेळेत वीज पुरवठा केला जात असून जळालेले ट्रान्सफार्मर बदलून देतांना ८० टक्के वीज थकबाकीची होत असलेली मागणी त्याशिवाय ट्रान्सफार्मर बदलून देणेस होत असलेली टाळाटाळ थकबाकीची असलेली अट शिथिल करून शेतकऱ्यांना अखंडित वीज पुरवठा करणेत यावा अशा प्रकारची मागणी

स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे ऑगस्ट २०२२ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जळालेले ट्रान्सफार्मर बदलून देतांनाची अट शिथिल करण्याबरोबरच शेतकऱ्यांना शेतीपंपासाठी दिवसा व अखंडित वीज पुरवठा करण्यासाठी शासन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०४-२०२३) :** (१) हे अंशत : खरे आहे.

महावितरण कंपनीस शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत मनसे जिल्हा अध्यक्ष यांच्या दिनांक ०२/१२/२०२२ रोजीच्या निवेदनाची प्रत दिनांक ०५/१२/२०२२ रोजी प्राप्त झालेली आहे.

(२) नाशिक परिमंडळाअंतर्गत सर्व विभागात जळालेले ट्रान्सफार्मर अग्रक्रमाने बदलून देण्यात येतात, ट्रान्सफार्मर बदलून देताना सद्या ८० % वीज थकबाकी भरुन घेत नाही किंवा त्याबाबत आग्रह करीत नाही. शेतकऱ्यांना दिवसा ८ तास वीज पुरवठा देणे हे मुख्य उद्दिष्ट डोळयासमोर ठेवून शासनाने "कृषीपंप वीज जोडणी धोरण २०२०" अंतर्गत "मुख्यमंत्री सौर कृषीवाहिनी योजना" अन्वये वितरण उपकेंद्र स्तरावर विकेंद्रित सौरऊर्जा प्रकल्प उभारणीच्या माध्यमातून दीर्घकालीन योजना आखली आहे. तसेच, केंद्र शासनातर्फे प्रधानमंत्री किसान ऊर्जा एवंम उत्थान महाअभियान (प्र.मं. कुसुम) योजना राबविण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भुसावळ शहरासह तालुक्यातील वीज ग्राहकांना वीज दंयक ठेकेदार वेळेवर देत नसल्याबाबत

**(२९) ५०९३० (१९-०१-२०२३). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ शहरासह तालुक्यातील वीज ग्राहकांना वीज देयक ठेकेदार वेळेवर देत नसल्याचे दिनांक ५ नोव्हेंबर ,२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्यानुसार संबधित दोषी आढळणाऱ्या ठेकेदारावर काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०४-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

भुसावळ शहर उपविभागातंर्गत माहे ऑगस्ट २०२२ ते नोव्हेंबर २०२२ या कालावधीमध्ये एजन्सीचे वीज बिल प्रिंटरमध्ये तांत्रिक बिघाड झाल्यामुळे सुमारे ४७०० ग्राहकांना वीज देयक वेळेत न मिळाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) संबंधित ठेकेदाराकडून ग्राहकांना देयकाच्या प्रती देण्यास विलंब झाल्याचे निर्दशनास आले आहे. संबंधित दोषी आढळलेल्या ठेकेदारास विज देयके वेळेवर वाटप होत नसलेबाबत सक्त ताकीद देण्यात आलेली आहे व त्यांच्या माहे ऑगस्ट-२०२२ ते नोव्हेंबर-२०२२ च्या देयकात एकूण रु.९४३६/- इतक्या रक्कमेचा दंड आकारण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुलुंड पुर्वे(मुंबइ) वासंती सोसायटीच्या जागेत महावितरणचे असलेले ललीत नावाचे रोहित्र विकासकाने पाडल्याबाबत

**(३०) ५१७८६ (१७-०१-२०२३). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पूर्व उपनगरातील मुलुंड पुर्वेकडे नीलम नगरजवळ असलेल्या वासंती नावाच्या जुन्या सोसायटीच्या जागेत महावितरणचे फार पूर्वीपासून असलेले ललीत नावाचे रोहित्र (ट्रान्सफोर्मर) वासंती सोसायटीची इमारत पाडून त्याजागी

बहुमजली टावर उभारताना संबंधित विकासकाने सदर उपकेंद्र पूर्णपणे पाडले व रोहित्र अक्षरशः अडगळीत टाकून ते कोंदट अशा एका बंदिस्त जागेत ठेवले होते, हे खरे आहे काय
(२) असल्यास, दुरुस्तीसाठी आवश्यक असलेले ब्रेक्स मागील बाजूस गेले असल्याने आपत्कालीन स्थितीत हे ब्रेक्स दुरुस्त न केल्यास ते आधारित असलेल्या या रोहित्रातून तेलाची अर्थात डिझेलची गळती होऊन भीषण स्फोट होण्याची भीती असल्याप्रकरणी डॉक्टर संदीप वंजारी यांनी महावितरणाच्या संबंधित अधिका-यांकडे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यासुमारास लेखी तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी महावितरण अधिका-यांनी हलगर्जीपणा करित असल्याने यासाठी जबाबदार असलेल्यांवर कायद्यानुसार चौकशी करुन निलंबनाची कारवाई करावी अशी मागणीही सदरहू तक्रारीमध्ये स्पष्टपणे केली आहे, हे ही खरे आहे काय ,
(४) असल्यास, सदरहू तक्रारीनुषंगाने सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०४-२०२३) :** (१) हे खरे नाही.
भांडुप नागरी परिमंडळातील ठाणे नागरी मंडलाअंतर्गत मुलुंड विभागातील नीलम नगर उपविभागाअंतर्गत ललीत नावाचे रोहित्र हे अंदाजे १९८७ पासून वासंती विहार इमारतीच्या मागील बाजूस सुरक्षा भिंतीलगत एका रुममध्येच बसविण्यात आले होते. सदर इमारत पुर्नविकास करताना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या इमारत नियोजन विभागाकडून मिळालेल्या इमारत नकाशामंजुरीनुसार अग्निशमन दलाच्या गाडीस अडथळा होत असल्याने विकासकांनी सदर ललीत रोहीत्र स्थलांतरीत करण्याकरीता अर्ज केला. सदर रोहित्र स्थलांतरण व नवीन विद्युत भारासाठी ठाणे मंडल कार्यालयाने मंजुरी दिलेली आहे.
(२) याबाबतची लेखी तक्रार महावितरणकडे प्राप्त झाली आहे.
(३) चौकशी करुन कारवाईची मागणी तक्रारीमध्ये करण्यात आली आहे.
(४) सदर प्रकरणाबाबत तपासणी करण्यात आलेली असून विद्युत निरीक्षक यांचे सूचनेनुसार तसेच ग्राहकाच्या विनंती नुसार सदर ऑईल टाईप रोहित्र बदलुन ड्राय टाईप रोहित्र बसविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात ३१७ कोटी रुपयांची वीजचोरी होत असल्याबाबत

**(३१) ५१८०० (२०-०१-२०२३). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महावितरणने विभागीय स्तरावर नेमलेल्या पथकांनी २०२१-२२ मध्ये उच्च व लघुदाब वर्गवारीमध्ये २२ हजार ९८७ ठिकाणी ३१७ कोटी ४५ लाख रुपयांच्या वीजचो-या उघडकीस आणल्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास सन २०२१-२२ मध्ये तब्बल ५५७ दशलक्ष युनिट विजेची चोरी उघडकीस आणण्यात महावितरणरला यश आले असले तरी मुंबईमध्ये वीजचोरीचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, असल्यास, घरगुती वापरासाठी नाही तर व्यावसायिक वापरासाठी लाखो रूपयांच्या वीजेची चोरी केली जात असून इमारतीच्या बांधकामासाठीही अनधिकृत जोडणी करून वीज वापरली जात असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, वीज चोरीमुळे आर्थिक भार नियमित वीज देयक भरण्या-या सर्वसामान्य वीज ग्राहकांवर पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, वीज चोरी थांबविण्यासाठी शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही वा उपाययोजना करण्यात आली वा येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०४-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
महावितरणकडून सन २०२१-२२ या आर्थिक वर्षामध्ये उच्च व लघुदाब वर्गवारीमध्ये एकूण ४३००१ ठिकाणी रु.१६५.२३ रुपयांच्या वीजचोऱ्या उघडकीस आणण्यात आल्या आहेत. त्यामध्ये सुरक्षा व अंमलबजावणी (सुवअं) विभागातील भरारी पथकांव्दारे ५६७७ ठिकाणी रु. ८०.३४ कोटी रुपयांच्या वीजचोऱ्या उघडकीस आणण्यात आल्या आहेत.
(२) हे अंशत: खरे आहे.
महावितरणकडून सन २०२१-२२ या आर्थिक वर्षामध्ये एकूण ९७.९७ दशलक्ष युनिटची वीजचोरी उघडकीस आणलेली आहे. त्यामध्ये भरारी पथकांव्दारे ४७.९३ दशलक्ष युनिट्सची वीजचोरी उघडकीस आणण्यात आली आहे. तसेच मुंबईमधील मुलुंड व भांडूप विभागांतर्गत महावितरणतर्फे एकूण ३५० ठिकाणी १०.६० दशलक्ष युनिटची रु २.५३ कोटी रुपयांची वीजचोरी उघडकीस आणण्यात आली आहे. त्यामध्ये भरारी पथकांव्दारे एकूण ६ ठिकाणी ०.०५ दशलक्ष युनिटची रु. ११.९१ लाख रुपयांची वीजचोरी उघडकीस आणण्यात आली आहे.
(३) हे अंशत: खरे आहे.
महावितरणतर्फे एकूण ३९१७ व्यवसायिक ग्राहकांच्या वीजचोऱ्या उघडकीस आणून १३.०७ युनिटचे रु. २७ .२० कोटी रुपयांच्या वीजचोऱ्या उघडकीस आणण्यात आल्या आहेत. त्यामध्ये भरारी पथकांव्दारे १०२९ व्यवसायिक ग्राहकांच्या ८.३७ दशलक्ष युनिटचे रु. १३.२४ कोटी रुपयांच्या वीजचोऱ्या उघडकीस आणण्यात आल्या आहेत.
(४) हे खरे नाही.
वीज चोरीचा परिणाम वितरण हानी वाढण्यात होत असते, परंतु मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगातर्फे वीजदर निश्चिती करताना महावितरण कंपनीस प्रत्येक आर्थिक वर्षाकरिता वीज वितरण हानीचे लक्ष्य दिले जाते. महावितरण हे लक्ष्य प्रत्येक वर्षी साध्य करण्याचा प्रयत्न करते. त्याउपर वितरण हानी राहिल्यास मा. आयोग वितरण कंपनीस मंजूरी देत नाही. साहजिकच त्यामुळे, त्याचा भार इतर ग्राहकांवर पडत नाही.
(५) वीजचोरी थांबविण्यासाठी महावितरणतर्फे वेगवेगळया पातळीवर वेळोवेळी विशेष तपासणी मोहीम राबवून वीजचोरांविरुध्द कारवाई करण्यात येते. तसेच स्थानिक वृत्तपत्रांमध्ये वीजचोरी न करणेबाबत आवाहन करण्यात येते. महावितरणतर्फे वीजचोरीची माहिती देणाऱ्यास प्रोत्साहन देण्यासाठी महावितरणच्या नियमानुसार बक्षिस देण्यात येते.

---

## महाविकास आघाडीच्या काळातील जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत राज्यात मंजूरी केलेली काम रद्द केल्याबाबत

**(३२) ५२५९६ (१७-०१-२०२३). श्री.माधवराव पवार (हदगाव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्हयात जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत मंजूर करण्यात आलेली ४२.७१ कोटींची कामे रद्द केली असल्याने राज्यातील विविध जिल्हयातील विकास कामे प्रलंबित आहे हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, महाविकास आघाडीच्या काळातील जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत राज्यात मंजूरी केलेली काम रद्द करण्यात आलेली आहे हे ही खरे काय,
(३) असल्यास, शासनाने पुर्नविचार करुन सदरील कामांना मंजूरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०१-२०२३) :** (१), (२) व (३) हिंगोली जिल्ह्यामध्ये दिनांक २४/०६/२०२२ रोजीच्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीमध्ये रुपये ४२.७१ कोटींच्या कामांना मान्यता दिलेली होती. परंतु एकाही कामास प्रशासकीय मान्यता दिलेली नव्हती. नवीन पालकमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २८/१०/२०२२ रोजी

झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीमध्ये सदर कामे पुर्नविचारार्थ सादर करण्यात आली असता, यापूर्वी मान्यता दिलेली कामे रद्द करुन नवीन कामे घेण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार नवीन कामांना प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही सुरु आहे ४) प्रश्न उदभवत नाही

---

**वरूड, धानोरा व मोर्शी (जि.अमरावती) तालुक्यातील आदिवासी मुलांचे व मुलींचे वसतीगृहास मान्यता देण्याबाबत**

**(३३) ५२६५७ (१८-०१-२०२३). श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील वरूड, धानोरा व मोर्शी या तालुक्यातील आदिवासी मुलांमुलींसाठी वसतीगृहास मान्यता प्रदान करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ०६ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास दिलेल्या निवेदनावर उपमुख्यमंत्री यांनी कार्यवाही करण्याचे आदेश दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तीनही ठिकाणी आदिवासी मुलांमुलींसाठी वसतीगृह सुरु करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**डॉ. विजयकुमार गावीत (१२-०५-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) शासकीय मुलांचे वसतीगृह मोर्शी या कामास प्रशासकीय मान्यता प्राप्त असून सद्यस्थितीत कामाचे कार्यारंभ आदेश निर्गमित करणेबाबतची कार्यवाही कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग अमरावती यांच्यास्तरावर प्रगतीत आहे.

शासकीय मुलां-मुलींचे वसतीगृह वरुड आणि शासकीय मुलींचे वसतीगृह धानोरा या कामाचे प्राथमिक अंदाजपत्रक शासनाकडे प्राप्त झाले असून अंदाजपत्रकाची तपासणी करुन पुढील कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना/ राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना अंतर्गत मयत कर्मचा-यांच्या कुटुंबाना सानुग्रह अनुदान व निवृत्ती वेतनाचे लाभ मिळण्याबाबत**

**(३४) ५२७८६ (२०-०१-२०२३). श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना/ राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना अंतर्गत मय्यत कर्मचा-यांच्या कुटुंबाना सानुग्रह अनुदान व निवृत्ती वेतनाचे लाभ मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (धामणगाव रेल्वे) यांनी मा.मुख्यमंत्री यांना माहे मे २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीनुसार सदरहू लाभ मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) राज्य शासनाच्या सेवेत दि.१.११.२००५ रोजी वा त्यानंतर नियुक्त झालेल्या व राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणालीचे सदस्य असलेल्या कर्मचाऱ्याचा सेवेत असताना मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटूंबियांना कुटूंबनिवृत्तिवेतन आणि मृत्यू उपदानाचा लाभ लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### गोरेगांव (मुंबई) पात्राचाळ येथे वस्तीगृह बांधण्याच्या घेतलेल्या निर्णयाबाबत

**(३५) ५२८४० (२९-०१-२०२३). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षण व नोकरीच्या निमित्ताने बाहेरुन मुंबईत येणाऱ्या तरुण-तरुणींच्या निवासाची आणि खाण्यापिण्याची अडचण लक्षात घेऊन म्हाडाच्या मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाने पत्राचाळ, गोरेगाव व जिजामाता नगर, काळाचौकी येथे वसतिगृह बांधण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कामाची सुरुवात एकाच दिवशी एकाच सोहळयात करण्याचा निर्णय घेतला असुन केवळ गोरेगाव मधील पत्राचाळ येथील वसतिगृहाचा भव्य सोहळा दिनांक २२ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास संपन्न झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पत्राचाळ, गोरेगाव येथे वसतिगृहाच्या बांधकामाची सुरुवात झाली असून जिजामाता नगर येथील वसतिगृहाचे बांधकाम करण्यासाठी कंत्राटदाराला कार्यादेश देऊन ८ महिन्यांपेक्षा अधिक कालावधी उलटून गेला तरीही जिजामाता नगर येथील वसतिगृहाच्या बांधकामास अद्याप सुरुवात झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जिजामाता नगर येथील वसतिगृहाचे बांधकाम लवकर पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०३-२०२३) :** (१) व (२) म्हाडाच्या मुंबई मंडळाच्या अभिन्यासातील गोरेगाव येथील पत्राचाळ या वसाहतीमध्ये मुला-मुलींकरीता वसतीगृह बांधण्याचा कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही.

जिजामाता नगर, काळाचौकी, मुंबई येथील भूकर क्र.१५८ या म्हाडाच्या मुंबई मंडळाच्या मालकीच्या भूखंडावर मुला-मुलींचे वसतीगृह बांधण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

(३), (४) व (५) जिजामाता नगर येथील मुला-मुलींच्या वसतीगृहाच्या बांधकामाकरीता वास्तुशास्त्रज्ञाची नियुक्ती म्हाडाकडून करण्यात आली आहे. सदरहू कामाकरीता म्हाडाकडून ई-निविदा मागविण्यात आल्या. सदरहू निविदानुसार न्यूनतम निविदाकारास दि.२२.११.२०२२ रोजी कार्यादेश देण्यात आले आहेत. उक्त काम पूर्ण करण्याचा कालावधी २४ महिने एवढा आहे.

---

### पालघर जिल्यातील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, डहाणू विभाग, या प्रकल्पांतार्गत कंत्राटी तत्वावर काम करणाऱ्यांना शासकिय सेवेत सामावून घेण्याबाबत

**(३६) ५२९४८ (१८-०१-२०२३). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्यातील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, डहाणू विभाग, या प्रकल्पांतार्गत शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळेत कंत्राटी तत्वावर काम करणाऱ्या संगणक शिक्षक/निर्देशक, कला शिक्षक आणि क्रिडा शिक्षक यांचे शासकीय शासकीय सेवेत समायोजन करण्यात यावे अशी मागणी कंत्राटी कर्मचाऱ्यांकडून शासनाकडे वारंवार करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वाढते वय व बेरोजगारीचा प्रश्न निर्माण होऊ नये याकरीता त्यांची कोरोना काळातील सेवा व कामाचा अनुभव लक्षात घेऊन त्यांना शासकीय सेवेत कायम करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. विजयकुमार गावीत (२७-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) आदिवासी विकास विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयांचा सुधारित आकृतीबंध दिनांक १६ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये अंतिम करण्यात आलेला आहे. प्रस्तुत आकृतीबंधामध्ये प्रत्येक शासकीय

आश्रमशाळेत १ कला, १ क्रिडा व १ संगणक शिक्षक एकूण १४९७ पदे मंजूर करण्यात आली असून त्यांच्या सेवा बाह्यस्त्रोताद्वारे घेण्यास मंजूरी देण्यात आलेली आहे.

---

### अमरावती जिल्हयात गेल्या आठ महिन्यांपासून जिल्हा नियोजन समितीची बैठक न झाल्याबाबत

**(३७) ५२९४९ (१९-०१-२०२३). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयात दिनांक १२ जानेवारी, २०२२ नंतर जिल्हा नियोजन समितीची बैठक न झाल्यामुळे ३०० कोटी रुपयांची अनेक विकासकामे बंद झाली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे शासनाने सदर समितीच्या सदस्यांची तातडीने निवड करुन नियोजन समितीची तातडीने बैठक घेऊन येथील विकासकामे मार्गी लावण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०३-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील वीज दरवाढीवर नियंत्रण आणण्याबाबत

**(३८) ५३१३४ (२०-०१-२०२३). श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.राजु पारवे (उमरेड), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात घरगुती, व्यापारी आणि औद्योगिक वीजदर २०१७ पासून म्हणजे सुमारे ७ वर्षांपासून देशाच्या तुलनेने सर्वाधिक आहेत व शेजारील राज्यापेक्षा २० ते ४०% ज्यादा आहेत, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, राज्यातील औद्योगिक ग्राहकांना केलेली वीज दरवाढ मागे घेण्याच्या मागणीसाठी अहमगनगर जिल्ह्यातील उद्योजकांनी नगर येथील एमआयडीसी महावितरण कार्यालयासमोर वीज देयके जाळून टाकल्याची बाब माहे सप्टेंबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे, खरे आहे काय,
(३) असल्यास, इंधन समायोजन आकाराच्या नावाखाली औद्योगिक वीज पुरवठा दरात केलेली २० टक्के दरवाढ तातडीने मागे घ्यावी तसेच औद्योगिक क्षेत्रातील वीज बिल वसुली ९० टक्के टप्प्यापेक्षा जास्त असल्याने दुप्पट सुरक्षा ठेव जमा करण्याचे आदेश ही मागे घ्यावा अशी मागणी करत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, ऊर्जामंत्री महोदयांना ई-मेलद्वारे आपले निवेदन पाठविले आहे, हे ही खरे काय,
(४) असल्यास, इंधन समायोजन आकाराच्या एकूण हिशोबामध्ये वीज वितरण गळती १४ टक्के ऐवजी मार्च मध्ये ३५ टक्के, एप्रिल मध्ये ३० टक्के व मे मध्ये २६ टक्के याप्रमाण सरासरी दाखवून ३० टक्के गळती मान्यता देण्यात आल्याने ग्राहकांवर अतिरिक्त १६ टक्के गळतीमुळे होणारे नुकसान महावितरण कंपनी भरावा यासाठी कायदेशीर तरतूद करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे काय,
(५) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने राज्यातील वीज दरवाढीवर नियंत्रण आणण्याबाबत कोणती कार्यवाही तसेच उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०४-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
विद्युत अधिनियम २००३ मधील तरतूदीनुसार मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगास राज्यातील वीज वितरण परवानाधारकांच्या ग्राहकांचे वीजदर निश्चित करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग वेळोवेळी बहुवर्षीय वीजदर विनियम करते त्यानुसार एकूण महसूलाची गरज व त्याप्रमाणात वीजदर ठरवून मिळावेत याकरीता मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे वितरण कंपनीमार्फत प्रस्ताव सादर करावा लागतो. या प्रस्तावावर संपूर्ण नियामक प्रक्रियेच्या अवलंब करुन मा. आयोगातर्फे वीज दराबाबत निर्णय घेण्यात येतो व त्यानुसार वितरण कंपनीकडून वीज दराची आकारणी करण्यात येते. राज्यातील ग्राहकांना लागू असलेले वीजदर प्रथमदर्शनी अधिक असले तरी काही मुलभूत बाबींचा जसे की, उपलब्ध वीजनिर्मिती स्त्रोतांमधील भिन्नता, त्या अनुषंगाने बदलणारी वीज खरेदी किंमत, ग्राहक वर्गवारी व ग्राहकांच्या वीज वापरांमधील वैविध्य, तुलनेने मोठे भौगोलिक क्षेत्रे, इ. बाबींचा देखील तुलना करुन विचार करणे आवश्यक आहे. तसचे प्रत्येक राज्यातील नैसर्गिक साधन संपत्ती मध्ये मोठया प्रमाणात तफावत आहे.
(२) हे खरे आहे.
एमआयडीसी कक्ष महावितरण कार्यालयासमोर विजेची बिले दि.१०.०८.२०२२ रोजी जाळली असल्याची बाब निदर्शनास आली आहे.
(३) हे खरे आहे.
इंधन समायोजन आकार मा. आयोगाच्या मंजूरीनुसार व नियामक तरतूदींच्या आधारे लावण्यात येतो. तसेच मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या विद्युत पुरवठा संहिता, वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके आणि पॉवर क्वालिटी विनियम २०२१ च्या तरतूदी नुसार अतिरिक्त सुरक्षा ठेवीची स्वतंत्र देयके ग्राहकास देण्यास आलेली आहेत.
(४) हे खरे आहे.
(५) महावितरणतर्फे वीज दर वाढीवर नियंत्रण आणण्यासाठी MoD तत्वाचे संचलन, कमाल मागणी असलेल्या काळात वीज एक्सचेंज व्दारे वीज खरेदी, आवश्यकतेपेक्षा जास्त वीज एक्सचेज व्दारे विकणे/अल्पकालीन निविदा, वीजेची देवाण-घेवाण अशा विविध प्रकारच्या उपाययोजना करण्यात येत आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सांगली जिल्ह्याच्या विकासकामासाठी जिल्हा नियोजन विभागाकडून मिळालेल्या निधी अखर्चित राहिल्याबाबत

**(३९) ५३१३८ (२४-०१-२०२३). श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.राजु पारवे (उमरेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्हा परिषदेला जानेवारी, २०२२ अखेर जिल्हा नियोजन विभागाकडून मिळालेल्या १४३ कोटी रुपयांपैकी केवळ ३९% निधी खर्च झालेला असल्याचे आढळून आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उर्वरित ६१ टक्के निधी अखर्चित राहणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करून जिल्ह्याच्या विकासासाठी आलेल्या निधीचा वापर न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०३-२०२३) :** (१) जिल्हा नियोजन समिती, सांगली यांच्याकडून पुर्नविनियोजनाअंती जिल्हा परिषदेला मार्च २०२२ अखेर रुपये २०८.३९ कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला
असून त्यापैकी रुपये १२३.१८ कोटी (सुमारे ५९.११ टक्के) निधी खर्च करण्यात आला आहे.
(२) वित्त विभागाच्या दिनांक ०६/०६/२००८ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार सदर अखर्चित निधी दिनांक ३१/०३/२०२३ पर्यंत खर्च करण्यास अनुमती आहे.

त्यानुसार कामे प्रगतीपथावर असून निधी खर्च करण्याचे नियोजन केले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही

---

**यवतमाळ जिल्हयातील ईसापूर धरणाच्या उर्ध्व पेनगंगा प्रकल्पांतर्गत उपविभागीय अभियंता, सिंचन विभाग, क्र.२ उमरखेड,यांनी शासकीय निधीचा गैरवापर केल्याबाबत**

**(४०) ५३२२० (१८-०१-२०२३). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्हयातील ईसापूर धरणाच्या उर्ध्व पेनगंगा प्रकल्पांतर्गत उपविभागीय अभियंता, श्री.एच.एस.धुळगुंडे, सिंचन विभाग, क्र.२ उमरखेड, हे अधिकारी कार्यालयात सतत अनुपस्थित राहून शासकीय निधीचा गैरवापर करीत असून शेतकऱ्यांना नाहक त्रास देत असल्याने त्यांची प्रतिनियुक्ती कायम रद्द करण्याबाबत उमरखेड व पुसद तालुक्यातील सिंचन लाभक्षेत्रातील शेतक-यांनी लेखी निवेदनाद्वारे मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्याकडे माहे नोव्हेंबर, २०२२, मध्ये वा त्यादरम्यान विंनती केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, श्री.धुळगुंडे यांच्या कार्यकाळात झालेल्या शासकीय निधिच्या कामावरील देयकांची, कामगारांची आणि साहित्य खरेदी बिलांची योग्य ती सखोल विभागीय चौकशी करण्याचीही विनंती करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनानुसार शासनाने या प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने उपविभागीय अभियंत्यांवर कोणत्या कलमान्वये कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०५-२०२३) :** (१) नाही.
परंतु श्री. नामदेव ससाणे, विधानसभा सदस्य यांनी दि.२२/११/२०२२ रोजी अपर मुख्य सचिव, जलसंपदा यांना निवेदन दिले आहे.
(२) होय
(३) मा. श्री. नामदेव ससाणे, विधानसभा सदस्य उमरखेड यांनी अपर मुख्य सचिव ( जलसपंदा) यांना दिलेल्या दि. २२/११/२०२२ च्या निवेदनाच्या अनुषंगाने संबंधित मुख्य अभियंता यांच्या कडून वस्तुनिष्ठ अहवाल दि.०२/०२/२०२३ च्या पत्रान्वये प्राप्त झाला आहे. सदर अहवालात उपअभियंता यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने बाबी सिध्द होत नसल्याचे नमुद करण्यात आले आहे.
तथापि, मा. लोकप्रतिनिधी यांच्या प्राप्त तक्रारीचे स्वरुप व कार्यकारी अभियंता, जालना पाटबंधारे विभाग, जालना यांनी दि. ३०-१२-२०२२ च्या पत्रान्वये श्री. धुळगंडे यांच्या सेवा मुळ विभागास परत करण्याबाबत केलेली विनंती विचारात घेता श्री. धुळगंडे यांच्या उमरखेड येथे तात्पुरत्या वर्ग केलेल्या सेवा शासन आदेश दि. ११/०४/२०२३ अन्वये रद्द करण्यात आल्या आहेत. सबब, त्यांच्या सेवा मुळ विभागात जालना पाटबंधारे विभाग जालना अंतर्गत निम्न दुधना पाटबंधारे उपविभाग क्र.२ सेलु येथे प्रत्यार्पित करण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पेगलवाडी (ता.त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक ) येथील पेगलवाडी वळण बंधारा योजना अपूर्ण असल्याबाबत**

**(४१) ५३२४८ (१८-०१-२०२३). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पेगलवाडी (ता.त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक ) येथील पेगलवाडी वळण बंधारा योजना या अपूर्ण असलेल्या योजनांची सखोल चौकशी करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १५ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास उपमुख्यमंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे विनंती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०३-२०२३) :** (१) हे खरे नाही.

तथापि, मा.श्री. हिरामण भिकाजी खोसकर विधानसभा सदस्य यांनी तत्कालीन मंत्री (जलसंपदा) यांना सदर विषयाबाबत दि. १९.०४.२०२२ रोजी निवेदन दिलेले आहे.

(२) मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, उत्तर महाराष्ट्र प्रदेश,नाशिक यांनी दि. २८.०७.२०२२ च्या पत्रान्वये अहवाल सादर केलेला आहे. त्यानुसार सदर योजना पूर्ण झाली असून सदर योजनेचा फायदा शेतकऱ्यांना होत असलेचे मत नोंदवले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदेड जिल्ह्यातील मनेरवारळू, कोळी समाजाला जात प्रमाणपत्र मिळण्याबाबत

**(४२) ५३२९७ (१८-०१-२०२३). श्री.राजेश पवार (नायगांव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक जाती-जमातीच्या लोकांचे वास्तव्य असून नांदेड जिल्ह्यात मनेरवारळू, कोळी समाज मोठ्या प्रमाणात आहे, तेथील नागरिकांना नोकरीसाठी, शिक्षणासाठी, निवडणुकीसाठी जात वैधता प्रमाणपत्राची आवश्यकता असते, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, जात वैधता प्रमाणपत्रासाठी अर्ज केल्यास एस.डी.एम. कार्यालयातील अधिका-यांकडून लाच मागितली जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रमाणपत्रासाठी जाणूनबुजून त्रुटी काढून प्रमाणपत्र वेळेवर न मिळाल्यामुळे अनेकांना नोकरी, शिक्षणापासून वंचित राहवे लागले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत आढळून आलेल्या दार्षींवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. विजयकुमार गावीत (०१-०४-२०२३) :** (१) ''महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० लागू केला आहे. सदर अधिनियमातील कलम ३ नुसार अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या जागांचा लाभ घ्यावयाचा असल्यास अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही. अनुसूचित जमाती प्रवर्गातील व्यक्तींना अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र देणे व अशा प्रमाणपत्राची पडताळणी करणे या बाबींचे विनियमन करण्याकरिता "महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० लागू केले आहे. व त्यानुषंगाने महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २००३ लागू केले आहे. सदर अधिनियम व नियमातील तरतूदीनुसार वैधता प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करण्यात येते.

तसेच शासन आणि आयुक्त कार्यालयांकडून समित्यांकडील प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याबाबत नियमित समिती कार्यालयाचा साप्ताहिक आढावा घेण्यात येतो. त्याचप्रमाणे समितीकडील प्रलंबित प्रकरणे "गती अभियान" अंतर्गत निकाली काढण्यात येत आहे. अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणीची कार्यवाही ही ऑनलाईन व्हावी तसेच

अर्जदारास विविध टप्प्याची माहिती ऑनलाईन उपलब्ध व्हावी यासाठी माहिती तंत्रज्ञानाच्या अत्याधुनिक पध्दतीचा वापर करुन दिनांक १.५.२०१६ पासून समितीचे कामकाज etribevalidity.mahaonline.gov.in वर etribe validity "आदि प्रमाण प्रणाली" या संगणकीय प्रणालीव्दारे सुरु करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिवरा नाईक , किन्ही नाईक, श्रीकृष्ण नगर (ता. चिखली जि बुलडाणा) आदिवासी लोकसंख्या असलेल्या गावांचा समावेश शासनाच्या माडा मिनीमाडामध्ये करण्याबाबत**

**(४३) ५३३१२ (१८-०१-२०२३). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिवरा नाईक , किन्ही नाईक, श्रीकृष्ण नगर (ता. चिखली जि बुलडाणा) गावामध्ये ५० टक्के पेक्षा जास्त आदिवासी बांधवांची संख्या आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास त्या गावांचा समावेश शासनाच्या माडा मिनीमाडामध्ये करण्यात यावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी आदिवासी विकास मंत्री यांच्याकडे माहे, सप्टेंबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केली हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (२२-०३-२०२३) :** (१) व (२) होय,हे खरे आहे,
(३) मा.राष्ट्रपती महोदय यांच्याद्वारा महाराष्ट्र राज्याच्या अनुसूचित क्षेत्राबाबत दि.२ डिसेंबर १९८५ रोजी अधिसूचना काढण्यात आलेली आहे.

दि.२ डिसेंबर १९८५ रोजीची अधिसूचना काढून ३७ वर्षाचा कालावधी झालेला आहे. त्यामुळे सद्यस्थितीत महाराष्ट्र राज्याच्या अनुसूचित क्षेत्राची पुनर्रचना करणे आवश्यक आहे. अनुसूचित क्षेत्रात गावांचा समावेश करण्यासाठी केंद्र शासनाने दि.२६ मे,२०१५ च्या पत्रान्वये काही निकष निश्चित केले आहेत. महाराष्ट्र राज्याच्या अनुसूचित क्षेत्राच्या पुनर्रचनेच्या अनुषंगाने दि.२३/११/२०२२ रोजी मा.मंत्री,आदिवासी विकास यांच्याकडे बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकितील चर्चेनुसार व केंद्र शासनाच्या निकषांनुसार आयुक्त,आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे यांच्यामार्फत राज्याच्या अनुसूचित क्षेत्राच्या पुनर्रचनेचा प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही चालू आहे
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली जिल्ह्यातील लिंबाळा मक्ता औद्योगिक वसाहतीमध्ये रेशनच्या तांदुळ व गहू याचा काळाबाजार होत असल्याबाबत**

**(४४) ५३३७४ (२४-०१-२०२३). श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्ह्यातील लिंबाळा मक्ता औद्योगिक वसाहतीमध्ये रेशन काळाबाजार केंद्र बनले असल्याची हिंगोली ग्रामीण पोलिसांनी मारलेल्या छाप्यात आढळून आले असल्याची बाब माहे ऑक्टोबर २०२२ च्या दुसऱ्या आठवड्यात व त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास हिंगोली ग्रामीण पोलिसांनी मारलेले छाप्यातील दोन वाहनात ३३० क्विंटल रेशनचे तांदूळ व गहू जप्त करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या छाप्यात लाखो रुपयांच्या मुद्देमाला सह जप्त करून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या अनुषंगाने शासनाने संबधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०४-२०२३) :**(१) व (२),

होय, शासनातर्फे स्वस्त धान्य दुकानातुन जनतेला शिधापत्रिकेवर कमी किंमतीला दिला जाणारा ३३० क्विंटल गहू व तांदूळ चढ्या भावात विक्री करण्याकरीता घेऊन जात असतांना दिनांक १२.१०.२०२२ रोजी मक्ता, एम.आय.डी.सी. जिल्हा हिंगोली येथे मालवाहू गाडी पोलीस घटकाला मिळून आली.

(३) व (४)

सदर प्रकरणी पोलीस स्टेशन हिंगोली, ग्रामीण येथे गु.र.नं. ३०६/२०२२ अत्यावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३ व ७ नुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास पुर्ण झाला असून मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात येत आहे.

(५) विलंब झालेला नाही.

---

## उरुळी कांचन (ता. हवेली, जि.पूणे) या भागातील विजेच्या समस्येबाबत

**(४५) ५३४०० (१९-०१-२०२३). ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हवेली (जि.पुणे) तालुक्यातील उरुळी कांचन उपविभागातील ३३/२२ केव्ही कोरेगाव मुळ येथील उपकेंद्रास १३२/२२ केव्ही अतिउच्च दाब यवत येथील उपकेंद्रातून निघणाऱ्या ३३ केव्ही कोरेगाव मुळ वाहिणी द्वारे वीज पुरवठा करण्यात येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ३३ केव्ही कोरेगाव मुळ वाहिनीचे अंतर सुमारे २४ किमी असनू या वाहिनीस सद्या पर्यायी स्तोत्र उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, येणाऱ्या विद्युत वाहिनी मध्ये काही बिघाड झाल्यास उरुळी कांचन उपविभागतील जवळपास पन्नास टक्के भाग अंधारात जाणे, पर्यायी स्तोत्र उपलब्ध नसल्याने वीज ग्राहकांत असंतोष निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, १३२/३३ शिंदवणे अतिउच्च उपकेंद्रातून ३३ केव्ही नवीन उचच्चदाब वाहिनी ३३/११ कोरेगाव मूळ उपकेंद्रापर्यंत उभारण्यास परवानगी देणेबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(५) नसल्यास, विलंबची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०४-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

सदर ३३ के.व्ही. कोरेगाव मूळ वाहिनीचे अंतर १७ कि. मी. आहे. तसेच या वाहिनीस सध्या पर्यायी स्त्रोत उपलब्ध नाही.

सद्यस्थितीत, सुधारित वितरण क्षेत्र योजना प्रणाली सक्षमीकरण (RDSS) योजनेंर्तगत उरुळी कांचन उपविभागात नवीन ३३/२२ के.व्ही., २X५ एम.व्ही.ए. क्षमतेचे अष्टापूर उपकेंद्र प्रस्तावित केले आहे. योजनेच्या या घटकास केंद्र शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही प्राधान्याने करण्यात येईल. सदरील उपकेंद्रामुळे उरुळी कांचन उपविभागास उत्तम पर्याय स्तोत्र निर्माण होईल. तसेच, सद्याच्या ३३/२२ के.व्ही. कोरेगाव मूळ येथील उपकेंद्रावरील भार विभागाला जाईल.

(३) हे अंशत : खरे आहे.

सदर वाहिनीवर कोणत्याही प्रकारचा तांत्रिक बिघाड झाल्यास, तो बिघाड प्राधान्याने कमीत कमी वेळेत दुरुस्त करुन वीजपुरवठा सुरळीत करण्यात येतो.

माहे एप्रिल २०२२ ते आजपर्यंत नियमित देखभाल व दुरुस्तीसाठी तसेच तांत्रिक बिघाडामुळे एकूण ७ वेळा, या विद्युतवाहिनीमध्ये फक्त ९ तास व ३० मिनिटे कालावधीसाठी विद्युत पुरवठा खंडीत झाला होता.

(४) १३२/३३ के.व्ही. शिंदवणे अति उच्च दाब उपकेंद्र हे जलसंपदा विभागाच्या अखत्यारीत आहे. या उपकेंद्राची उभारणी १३२ केव्ही, २५.५३ MW क्षमतेच्या वीज जोडणी करीता जलसंपदा विभागाने पुरंदर जल उपसा पाणीपुरवठा योजनेसाठी स्वखर्चाने केलेली आहे. सदर उपकेंद्रातून नवीन ३३ के.व्ही. उच्चदाब वाहिनी उभारण्याबाबतची तांत्रिक सुसाध्यता तपासणी करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कुंभारी (ता. जि. बीड) येथील सातरा-पोतरा रस्त्यामधील विदयुत वाहिनी स्थलांतरणाचे काम प्रंलबित असल्याबाबत

**(४६) ५३४०२ (२०-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुंभारी (ता. जि. बीड) येथील सातरा-पोतरा साठवण तलावाचे काम बळीराजा संजीवनी योजनेअंतर्गत पूर्ण झाले असून सदर रस्त्यामधील विदयुत वाहिनी स्थलांतरणाचे काम प्रंलबित असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सातरा-पोतरा साठवण तलावाअंतर्गत बुडीत होत असलेल्या वडगाव- कुंभारी- पोतरा, या उंचीवाढ इजीमा रस्त्यामधील विदयुत वाहिनी स्थलांतरणाचे काम करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी उर्जा मंत्री यांच्याकडे दिनांक १७ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०४-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सातरा-पोतरा साठवण तलावाअंतर्गत बुडीत होत असलेल्या वडगाव-कुंभारी-पोतरा या उंचीवाढ ईजीमा रस्त्यामधील विद्युत वाहिनी स्थलांतरणाची तांत्रिक मंजुरी दि.०३.०२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आली आहे. परंतु सदर जागेवर एकूण ४८ ग्राहकांची थकबाकी रु.१७.९७ लाख इतकी असून, सदर थकबाकीची रक्कम पूर्णपणे भरणा केल्यानंतर विद्युत वाहिनी स्थलांतरणाच्या कामास परवानगी देण्याचे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परभणी जिल्ह्यातील जिंतूर शहरातील महिलांचे सोशल मीडियावर मार्फ केलेले फोटो व्हायरल केल्याबाबत

**(४७) ५३४९८ (२४-०१-२०२३). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्ह्यातील जिंतूर शहरातील महिलांचे सोशल मीडियावर मार्फ केलेले फोटो व्हायरल करून बदनामी करण्यात येत असल्याने या प्रकरणी जिंतूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तहसील कार्यालयातील महिलेचे मार्फ केलेले फोटो समाज माध्यमावर व्हायरल केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी आरोपीचा शोध घेऊन पोलिसांनी कोणती कठोर कारवाई केली व करण्यात येत आहे काय,
(४) असल्यास, या अनुषंगाने शासनाने महिलांची बदनामी होऊ नये यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०३-२०२३) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) महिला तलाठी कर्मचारी यांचे फोटो मॉर्फ करुन सोशल मिडीयावर व्हायरल करुन त्यांची बदनामी केल्याप्रकरणी जिंतुर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ३७३/२०२२ भा.दं.वि. कलम ३५४ड, ५०० व माहिती तंत्रज्ञान कायदा २००० कलम ६६ (सी) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यातील आरोपीस अटक करण्यात आली असून गुन्ह्यात वापरलेला मोबाईल जप्त करण्यात आला आहे. आरोपी विरुध्द प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली असून पुढील तपास सुरु आहे.

(४) महिला अत्याचार प्रतिबंध करिता खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

i) महिला अत्याचाराबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार प्राप्त झाल्यास त्या बाबत तांत्रिक तपास करण्यासाठी महाराष्ट्र सायबर कार्यालयात महिला व बालक सायबर गुन्हे प्रतिबंध केंद्र (CCPWC) स्थापना करण्यात आलेले आहे. यामध्ये महाराष्ट्रातील सर्व अधिकारी व अंमलदारांना प्रशिक्षण देण्यात येते.

ii) सन २०१९ पासून महाराष्ट्र सायबर यांनी महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांतील पोलीसांच्या सहभागाने "सायबर सेफ वुमन" ही मोहिम सुरू केली आहे. त्या मध्ये इंटरनेट वरील फिशींग, वैवाहीक विषयक साईट वरील ओळख चोरी, फोटो मधील फेरबदल, बँका संदर्भातील फसवणूक, पोर्नोग्राफी, सायबर बुलिंग याची माहिती देणारी संकेतस्थळे यांची माहिती या पासून प्रतिबंधात्मक उपाय, सायबर गुन्हा संदर्भातील कायदे तसेच सोशलमिडिया वापरतांना घ्यावयाची काळजी याबाबत प्रत्येक जिल्हांत कार्यशाळा राबविण्यात येतात.

iii) महाराष्ट्र सायबर कार्यालयात महिला व बाल सायबर गुन्हे प्रतिबंध पोर्टल कार्यरत असून त्यावर राज्यभरातील महिला ऑनलाईन तक्रार दाखल करु शकतात.

iv) तसेच महाराष्ट्र सायबर कार्यालयात १९३० ही हेल्पलाईन कार्यरत असून त्यावर महिला तक्रार देऊ शकतात.

v) अशा प्राप्त तक्रारीची नोंद घेवुन पिडीत महिलांना न्याय मिळवून देण्याबाबत पोलीस घटकामार्फत मदत करण्यात येते.

(५) विलंब झालेला नाही.

---

## नाशिक जिल्हयातील लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाच्या अधिक्षक अभियंता यांनी शासकीय आदेशाचे उल्लघंन केल्याबाबत

**(४८) ५३७२७ (१८-०१-२०२३). श्री.महेंद्र थोरवे (कर्जत), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पावसाळा सुरु असल्याने शासनाने सर्व क्षेत्रीय अधिकारी, कर्मचारी यांना मुख्यालय सोडू नये असा दिनांक ६ जून, २०२२ रोजी शासन निर्णय निर्गमित केला हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक जिल्ह्यात माहे सप्टेंबर, २०२२ अखेरीस झालेल्या अतिवृष्टीमुळे गंगापूर व अन्य धरणांतून मोठया प्रमाणात पाण्याचा विसर्ग करण्यात येऊन पूरपरिस्थिती उद्भवली आणि नदीकाठच्या रहिवाशांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला असता नाशिक जिल्हयातील लाभक्षेत्र विकास प्राधिकरण च्या अधिक्षक अभियंता परदेश दौऱ्यावर गेल्याचे माहे सप्टेंबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार संबंधित अधिकारी यांच्या विरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०३-२०२३) :** (१) होय.

(२) होय. हे अंशत: खरे आहे.

जलसंपदा विभाग, शासन परिपत्रक दि.०१/०९/२०१० च्या अ.क्र. ०१ व सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक दि. २९/१२/२०१४ मधील मुद्दा क्र. १३ मधील तरतूदीनुसार सक्षम असणा-या प्राधिकाऱ्याची पूर्व परवानगी घेऊन

श्रीमती अलका ह. अहिरराव, अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नाशिक या दिनांक १३/०९/२०२२ ते दि.२१/०९/२०२२ या कालावधीत खाजगी कारणास्तव परदेश दौऱ्यानिमित्त अर्जित रजेवर होत्या. सदर रजा कालावधीमध्ये श्री. रा. बा. गोवर्धने, कार्यकारी अभियंता, पालखेड पाटबंधारे विभाग, नाशिक यांचेकडे प्राधिकरणाचा अतिरिक्त कार्यभार दि. १६.०९.२०२२ च्या आदेशान्वये दिला होता.

तसेच दि.०१/०९/२०२२ रोजी प्राधिकरणांतर्गत विविध धरणांमध्ये सुमारे ९५.८६% पाणीसाठा होता. प्राधिकरणाचे कार्यक्षेत्राअंतर्गत विविध धरणांची व अनुषंगिक भागांची वेळोवेळी पाहणी केली असून, आपत्ती व्यवस्थापन कायद्याच्या (Disaster management act) अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही अधीक्षक अभियंता व क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी केली आहे. अतिवृष्टी दरम्यान धरणस्थळे, शहर व इतर ठिकाणी पावसाळी हंगामात संबंधीत विभाग आणि क्षेत्रिय अधिकारी / कर्मचारी यांनी SOP / ROS प्रमाणे धरण परिचालन व्यवस्थित केले आहे. त्यामुळे पुरपरिस्थिती नियंत्रणात होती.

(३) सदर प्रकरणी प्रदेश कार्यालयाकडून शासनास अहवाल प्राप्त झाला आहे. याअनुषंगाने दि.१९.१२.२०२२ च्या आदेशान्वये श्रीमती अलका अहिरराव, अधीक्षक अभियंता व प्रशासक यांची अधीक्षक अभियंता तथा उप सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई येथे बदलीने पदस्थापना करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लोवरे (जि.पालघर)गावातील एका आदिवासी शेतकऱ्याला एचडीएफसी बँकेतील एका महिला कर्मचाऱ्यांनी फसवणूक केल्याबाबत**

**(४९) ५३७७६ (२६-१२-२०२२). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यात सुरु असलेल्या मुंबई-वडोदरा एक्सप्रेस वे, मुंबई-अहमदाबाद हायस्पीड रेल, वेस्टर्न डेडीकेटेड गुड्स फेट कॉरीडॉर सारखे मोठ्या प्रकल्पांमुळे बाधीत झालेल्या जमीन मालकांना बॅंकेतून आपलाच मोबदला काढतांना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघर मधील लोवरे गावातील एका आदिवासी शेतकऱ्याच्या अज्ञानाचा फायदा घेऊन बेटेगाव येथील एचडीएफसी बँकेतील एका महिला कर्मचाऱ्यांनी तब्बल ८ लाख रुपयांची फसवणूक केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त शेतकऱ्याला मुदत ठेवीमध्ये गुंतवणूक केल्याचे सांगत आदीत्य बिर्ला कॅपिटल या कंपनीच्या विमा पॉलिसीमध्ये गुंतवणूक केल्याचे दोन वर्षानंतर उघडकीस आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०२-२०२३) :** (१) जिल्हाधिकारी पालघर यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार ही बाब खरी नसल्याचे दिसून येते.

(२)अशी बाब नाही. मौजे लोवरे, ता.पालघर येथील जमीन मुंबई वडोदरामहामार्गासाठी संपादित झाली असून या जमिनीचा निवाडा दि.२९/०२/२०२० व दि.१८/१२/२०२० रोजी झालेला आहे व त्यानुसार दि.१२/१२/२०२० रोजी संबंधीत खातेदारांच्या थेट खात्यामध्ये संपादनाच्या मोबदल्याची रक्कम पाठविण्यात आली आहे. तद्नंतर कोणत्याही प्रकारची तक्रार जिल्हाधिकारी कार्यालयाला प्राप्त नाही.

(३) अंशत: खरे आहे. खातेदार यांचे सहमतीने गुंतवणूक केली असल्याचे शाखा व्यवस्थापक, एच.डी.एफ.सी.बँक लि.बोईसर यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पारोळा (जि.जळगाव) तालुक्यातील दळवेल येथे अज्ञाताने विहिर व जमिनीत रासायनिक द्रव्य फेकले असल्याबाबत

**(५०) ५३९२२ (२४-०१-२०२३). श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारोळा (जि.जळगाव) तालुक्यातील दळवेल येथे अज्ञात व्यक्तीने विहिर व शेतामध्ये रासायनिक द्रव्य फेकले असल्याचे दिनांक २२ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे रासायनिक द्रव्ययुक्त पाणी आजूबाजुच्या शेतामध्ये गेल्यानंतर त्यापासून पिकाला धोका उद्भवू शकतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिवाय येथील कुक्कूटपालनाचा व्यवसाय करणारे हे पाणी कोंबडयांसाठी वापरत असल्याने त्यापासून कोंबडया दगावण्याची भिती व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यामुळे शासनाने या गंभीर गुन्हयाचा तपास करुन दोषींवर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०३-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३)

सदर रासायनिक द्रव्ययुक्त पाण्यामुळे परिसरातील पिकांना व कुकुट पालन व्यावसायाला कोणाताही धोका उद्भवलेला नाही. तथापि, सदर रासायनिक द्रव्याचे नमुने तपासण्याकरीता उपसंचालक, न्यायवैद्यक शाळा, नाशिक येथे पाठविण्यात आले आहेत.

(४) सदर प्रकरणी तक्रार प्राप्त होताच अज्ञात व्यक्तीविरुध्द गु.र.नं. ३८७/२०२२ भा.दं.वि. कलम २८४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घटनेच्या परिसरातील रासायनिक कंपन्यांमध्ये सदर केमीकलबाबत तपास करण्यात येत आहे.

सदर गुन्हयाचा तपास सुरु आहे.

(५) विलंब झालेला नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव – १ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.